म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८८९
१८८२

९६३
काव्य

म. ग्रं. सं. ठाणें ९६३
लेखक पां. गो. शास्त्री पारखी
सन १८८२
क्रमांक ८८९
पुस्तकाचें नांव षड्‌ऋतुवर्णन

काव्य     नं ० वाच ९२१ C

...िज कमिटीनें पसंत केलेलें पुस्तक.

# षड्ऋतु-वर्णन.

हें पुस्तक,

## पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी.

असिष्टंट मास्तर नंबर १ स्कूल अमरावती प्रांत वऱ्हाड,

ह्यांनीं रचलें.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ आक्ताप्रमाणें नोंदिलें आहे.

मुंबईत,

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

१८८२.

किंमत ८ आणे.

# षड्ऋतु-वर्णन.

…डुरंग गोविंदशास्त्री पारखी यांनीं केलेल्या षड्ऋतुवर्णन नांवाच्या पुस्तकांत सहाही ऋतूंचें वर्णन असून हिंदुलोकांच्या मुख्य मुख्य सणांचेंही वर्णन केलें आहे. या पुस्तकाची एकंदर रचना संस्कृत–कवितेच्या पद्धतीची आहे, यांतील वृत्तें गोड असून निरनिराळ्या प्रकारचीं आहेत. ग्रंथकाराच्या अंगीं कल्पकपणा व मार्मिकपणा हे गुण बरेच आढळतात. ग्रंथकर्त्याचें कविता करण्याचें चातुर्य व संस्कृत भाषेचें ज्ञान हीं चांगलीं दिसतात. ह्या पुस्तकांतील कविता रसाळ व चटकदार असून बऱ्याच ठिकाणीं कल्पनाही नवीन नवीन दिसतात. कितीएक ठिकाणीं श्लेषादि अलंकार चांगले साधले आहेत, आणि त्यांचीं उदाहरणें जागोजाग आढळण्यासारखीं आहेत. आतां यांत कोठें कोठें अल्पस्वल्प दोष आढळतात, तथापि तसले दोष सर्व संस्कृत व मराठी ग्रंथांत आढळतात, ह्मणून त्याबद्दल ग्रंथकारास दूषण देतां येत नाहीं.

ह्या पुस्तकाची योग्यता चांगली कळण्याकरितां आह्मीं रा० रा० कृष्णशास्त्री राजवडे यांच्या ऋतुवर्णन-पुस्तकाशीं ( ज्यास द० प्रा० कमिटीनें पूर्वीं बक्षीस दिलें. ) याची तुलना करून पाहिली व त्यापेक्षां हें पु-

पुस्तकांत तीनच ऋतूंचे वर्णन
पुस्तकांत सहाही ऋतूंचें यथास्थित
राजवडे यांची सर्व कविता कालिदासकृत- या काव्यासच अनुसरून केलेली आहे. ही कविता तशी नसून पुष्कळ ठिकाणीं कवीच्या स्वकल्पनेची आहे. एकंदरींत पाहतां हें पुस्तक मनोरंजक व वाचण्यास योग्य आहे असें आमचें मत आहे.

**रावजी शास्त्री गोडबोले.**
दक्षिणाप्रैज कमिटीचे सेक्रेतरी.

---

हें पुस्तक आह्मी वाचून पाहिलें. सेक्रेतरी यांनीं या पुस्तकाविषयीं जो आपला अभिप्राय दिला आहे तसाच आमचाही आहे.

रा० रा० कृष्णशास्त्री राजवडे यांच्या पुस्तकाशीं ह्या पुस्तकाची तुलना करून सेक्रेतरी यांनीं जे गुण-दोष-विवेचन केलें तें सर्व यथार्थ आहे. या पुस्तकांत जे कोठें कांहीं दोष आढळतात ते सहज काढतां येण्यासारखे आहेत, ह्याकरितां सेक्रेतरी यांनीं सुचविलेल्या बक्षिसापेक्षां देखील अधिक बक्षिस देण्यास हें पुस्तक पात्र आहे, असें आह्मांस वाटतें.

**कृष्णशास्त्री चिपळूणकर.**

इतर पंचांचीं मतें वरील मतास प्रायः अनुसरून असल्यामुळें दाखल केलीं नाहींत.

# षड्ऋतु-वर्णन.

## वसंतऋतु.

पृथ्वी.

अनंत[1] सुमती[2]प्रती कळतसे न ज्याची कृती ।
अतर्क्य गमुनी मुनि–प्रभृति सर्व ज्या वर्णिती ।
चराचर जगीं दिसे चतुरता जयाची किती ।
अनादिविभु[3]-वर्णना जगदधीश देवो मती ॥ १ ॥

शार्दूलविक्रीडित.

टोंचूनी सृणि[4]नें उरीं परशुनें विघ्नासुरा तोडितो ।
भक्तांतें वरदस्वहस्तकमला आश्वासना दावितो ।
हस्तीं मोदक मोदकारक सदा तो विघ्नहर्ता धरी ।
वंदूं ज्ञानद भालचंद्र[5] जनता[6]-चेतस्–तम[7]ातें हरी ॥२॥

शिखरिणी.

प्रसादें वाणीच्या बहुत कवि झाले क्षितितलीं ।
जयांची सत्कीर्ती विमल भुवना-माजि भरली ।
जिच्या ईक्षा[8]मात्रें कवन करिती ही लघुमती[9] ।
जिची ऐशी शक्ती चकित करि सर्वांस जगतीं ॥ ३ ॥

वसंततिलका.

वृंदावनीं सुरभि[10]फुल्लितवल्लिजालीं ।
राधासवें करितसे रमणीय केली[*] ।

---

१ अनेक, शेष, किंवा कृतिविशेषण. २ ज्ञानी. ३ ईश्वर, व्यापक काल, ( अनादि व अनंत असा जो काल त्याचें वर्णन. हा पुढील वर्णनीय अर्थही यांत सूचित झाला ). ४ अंकुशानें. ५ गणपति ( तमोनाशनाविषयीं हें साभिप्राय विशेष्य ). ६ जनसमुदाय. ७ अज्ञान. ८ अवलोकन. ९ अल्पबुद्धि. १० वसंत, सुगंध. * क्रीडा.

आले बघूनि जवळी प्रिय गोपबाळ ।
गर्जूनि त्यांस पळवी हरि[1] रानमाळ ! ॥ ४ ॥

शार्दूलविक्रीडित.

कालाचा प्रभु काल न श्रुतिपथीं[2] आला च कोणी असे ।
त्रैलोक्यीं सकलां सुरासुरनरां व्यापून ही जो वसे ।
ज्याचा आदि तसा च अंत कळण्या सामर्थ्य कोणा नसे ।
ऐसा अद्भुतशक्ति काल जगतामाजी स्वयंभू[3] असे ॥ ५ ॥

आर्या.

विभाग कालाचे बहु, वत्सर[4] ऋतु मास पक्ष दिन ऐसे ।
तद्घटिता[5] ज्या गोष्टी, त्यांचें वर्णन अवश्य न च कैसें ६
आर्यांचे सण उत्सव, वर्षीं बहुतचि तयांत जे श्रेष्ठ ।
वर्णन त्यांचें होवो, रसिका स्वाद्वन्न ज्यापरी मिष्ट ॥७॥

साकी.

ऋतूस वर्णुनि त्यांतिल मोठे सण उत्सव वर्णावे ।
चित्तीं ऐसें धरिलें आहे, ईशें पूर्ण करावें ॥ ८ ॥

शार्दूलविक्रीडित.

द्यावी हे कवणास आद्य पदवी धाता[6] विचारीं पडे ।
तोली तो सकलां ऋतूंस मधुचें[7] खालीं पडे पारडें ।
योजी त्या प्रथमीं पदीं[8] तप[9] चढे तापास वर्षा[10] रडे ! ।
अन्योत्कर्ष बघून दुःखित सदा चित्तीं कुधी[11] चर्फडे ! ॥९॥

वसंततिलका.

आला ऋतूंतिल सहा पहिला वसंत ।
ज्या वर्णितात कवि जेवि तसे च संत ।

---

१ कृष्ण, सिंह. २ कर्णमार्गीं. ३ स्वतःसिद्ध. ४ वर्ष. ५ त्यांत घडलेल्या गोष्टी. ६ ब्रह्मदेव. ७ वसंताचें. ८ स्थानीं. ९ ग्रीष्म. १० पावसाळा. ( वर्षाऋतु ). ११ दुष्ट.

सं.का. १२५

लक्षणयुक्तकविता साधणें तर कठिणच आहे अशाविषयीं महान् महान् कवींचींही वचनें आढळतात.

नवोक्तिर्जातिरग्राम्या श्लेषोश्लिष्टःस्फुटोरसः ॥
मृदुलाक्षर-संबंधः कृत्स्नमेकत्रदुष्करं ॥

बाणभट्ट.

नव्या कल्पना, ग्राम्यताराहित्य, श्लेषयुक्तता, रसस्पष्टता, आणि मधुर शब्दयुक्तरचना इतके प्रकार एकत्र साधणें परम कठिण आहे. तथापि ते कठिण ह्मणून प्रयत्न करण्यास कोणी अनमान करूं नये.

ही कविता रचून बरींच वर्षे झालीं. दक्षिणाप्रैज कमिटीनें 'ऋतुवर्णन' हा विषय नेमला होता परंतु त्यावर चांगला ग्रंथ झाला नाहीं. असें कळल्यावरून मीं या विषयावर ग्रंथ करून कमिटीकडे पाठविला; परंतु सेक्रेटरीकडून असें लिहून आलें कीं या विषयावर एकच ग्रंथ आला होता. व त्यास कमिटीनें बक्षीस दिलें. तेव्हां त्याच विषयावरच्या तुमच्या ग्रंथास कमिटी बक्षीस देते किंवा नाहीं ह्याविषयीं कमिटीचा विचार घेऊन तुह्मांस काय तें कळवूं. पुढें दोन्हीही पुस्तकांची तुलना करून पहावी, असें कमिटीनें ठरविल्यावरून दोन्ही पुस्तकांची खरमरीत तपासणी झाली. पुढें मतें दाखल केलीं आहेत त्यावरून सर्व प्रकार वाचकांच्या स्पष्ट लक्षांत येईल.

द. प्रा. कमिटीकडून हा ग्रंथ पसंत झाल्यावर कांहीं अडचणीमुळें तो आजपर्यंत तसाच छापण्याचा राहिला. ह्या पुस्तकाचें स्वरूप पूर्णपणें लक्षांत आणून रसिक विद्वज्जन यास आपला उदार आश्रय देतील अशी आशा आहे.

अमरावती.
१५।७।८२

पां. गो. शा. पा.

## प्रस्तावना.

॥ १० ॥

सांप्रतकालीं मराठी भाषेंत बरेच ग्रंथ होऊं लागले आहेत. आतां त्यांत विद्वान् व रसिक वाचकांचें चित्त मोहून टाकणारे ह्मटले ह्मणजे फारच थोडे. गद्य ग्रंथापेक्षां पद्यग्रंथ तर फारच कमी होतात. याचें कारण त्यांची गोडी आपल्या लोकांस फारशी लागली नाहीं हेंच खरें. अलीकडे कवितेचें स्वरूपही निराळें झालें आहे. ह्मणजे तिला देखील वाटूं लागलें, कीं आपले लोक जसे राज्य-कर्त्यांच्या रीतीभातीचें अनुकरण करतात त्याप्रमाणें आपणही त्यांच्या स्त्रियांचें अनुकरण करावें, ह्मणजे अंगांत साधा झगा अडकाविला कीं झालें, उगीच अलंकारांचें लटांबर आंगावर उपयोगीं नाहीं. कारण, तें प्रियवाचकांच्या गळ्यांत अडकून जणूंकाय त्यांस रुततेंच ! किंवा आपली आर्यजननी जशी सुवर्णालंकाररहित झाली आहे तसेंच आपणही व्हावें, कारण जननीच्याच अंगावर जर अलंकार नाहींत तर मग आपल्या तरी कशाला पाहिजेत ! ! ह्मणूनच ती अलंकाररहित होत चालली आहे कीं काय कोण जाणे ! आपल्या प्राचीन कविरायांच्या सरस व सालंकार कविता कोणीकडे आणि हल्लींच्या कोणीकडे ? वामन, मोरोपंत, रघुनाथ-पंडित इत्यादिकांच्या कवितेंत संस्कृत शब्दांचा

द. प्रा. कमि[illegible]यामुळें तीस नाकें मुरडून सोपी व साधी अडचणीमुळें [illegible]गली, असें ह्मणणारांच्या कवितेचे मासले स-ह्या पुस्तका[illegible] नजरेपुढें आहेतच. आतां संस्कृत शब्दांचा उप-[illegible]योग केल्याखेरीज गद्यग्रंथास देखील प्रौढता व स्वारस्य येत नाहीं मग पद्यग्रंथास तर कोठून येणार ? मराठीची जननी जी संस्कृत भाषा तिची व तिच्या कन्येची ( मराठी भाषेची ) ताडातोड किंवा फारकत करून टाकून सुरस कविता करण्याची हौस धरणें, ह्मणजे गोडें पाणी सोडून, हें मोठें पाचक व हलकें आहे ह्मणून खाऱ्या पाण्यावर तहान भागविणें यासारखेंच होय. कविता रसाळ व वजनदार होण्याकरितां तींत संस्कृत शब्दांची भर जरूर पाहिजे. तसें केल्याखेरीज तिच्यांतील मिळमिळीतपणा जाऊन सरसता येणें नाहीं; व असें केलें असतां कांहीं कठिणपणा येणारच आहे. द्व्यर्थादि स्थळीं तर कालिदासादिकांच्या कवितेंत देखील कठिणपणा आलेला संस्कृतज्ञ मार्मिक वाचकांस माहित आहेच. असो.

मी हा कविता-बद्ध ग्रंथ केला आहे. यांत प्रायः संस्कृत कवितेचेंच अनुकरण केलें आहे, व अनेक प्रकारांनीं वाचकांची मनोरंजनरूप सेवा घडावी ह्मणून प्रयत्न केला आहे, परंतु तो कितपत सिद्धीस गेला आहे हें पाहणें सुज्ञ व मार्मिक वाचकांकडे आहे; आतां सर्व

कामीजनांस पळ घेउं न दे उसंत ।
दांतांस[1] ही प्रगटुनी करितो अशांत ॥ १० ॥

मालिनी.

सकलऋतुमधें हा शोभतो फार रम्य ।
ऋतु सकलगुणांहीं युक्त नाहीं च अन्य ।
मनुज बहुत भोगां भोगुनी होय धन्य ।
दिवस दवडितो हे व्यर्थ तो सत्य वन्य ॥ ११ ॥

आर्या. ( गीति ).

वीतें[2] लालित[3] शोभे, तारापति[4]मंडल स्फुरत्कांति ।
रामा[5]तुर[6]नेत्रांनीं, दृष्ट जसा वातसुत[7] सुरभि[8]मूर्ति ॥ १२ ॥

दिंडी.

पुराणांतें[9] टाकिती बहुदलांतें ।
नविन विटपीं आश्रिती पलाशां[10,11] ते* ।
अधीं कूद्र्वें[12] मधु[13]सक्त ही तशांत ।
कां न वृत्तिभ्रष्टत्व[14] हो अशांत! ॥ १३ ॥

साक्या.

कोमल मंजुल किसलय फुटती तरुंवर दिसती शेंडे ।
वाटे मजला पंचशरानें[15] रोवियले कीं झेंडे ! ॥ १४ ॥
रसाल[16] तरुंवर मंजु मंजुऱ्या हालति लट लट साऱ्या ।
मदननृपाची स्वारी आली म्हणुनि च फिरति चौऱ्या ! १५

---

१ साधु. २ वायु ( हनुमंताचा बाप ). ३ लाड केलेला, सेवित. ४ वाली, चंद्र. ५ राम, स्त्रिया. ६ उत्सुक. ७ हनुमान्. ८ वसंत. ९ बहु आहेत दलें=पत्रें ज्याचे ठायीं अशा पोथ्या, ( पक्षीं ) पुराणें= जुनीं अशीं बहु दलें पर्णें. १० जारिणी, फांद्या. ११ मांसाहारी, पानें. *वृक्ष. १२ वाईट कुलांत जन्मलेले, वृक्ष. १३ मद्य, वसंत. १४ दूषित, पानें गळणें. १५ मदन. १६ आंबा.

मंजरिवरि ते सुंदर मधुकर करिती मधुर रवांतें ।
अनंग[१]राजा आला म्हणुनि च वाजविती वाद्यांतें ! ॥१६॥
पल्लव-मध्यें कलिका खुलती, झुलती वरती भृंग ।
कामुक जणुं कीं केव्हां होइल नूतन–[२]युवतीसंग ! ॥१७॥
भृंग अहंकृति[३]सह तैं करिती झंकृति मज वाटे तें ।
मनोज[१]हुंकृति विरह्याला कीं, टंकृति तद्धनुची ते॥१८॥
मकरंदातें प्राशित खेळत, म[४]धुकर करिति विलास ।
दुजे मजेचे शोकी लोकीं नाहिंत दुसरे खास ॥ १९ ॥
कुंजीं[५] मधुकर पुंजी[६] होती, गुंजी-शब्द विराजे ।
वनदेवीच्या मंजीरांचें[७] सिंजित[८] जणुं हें साजे ॥ २० ॥
स्मरदे[१]वाचे मधुकर मांत्रिक जपुनी जणु मंत्रातें ।
परा[९]गभस्मा फुंकुनि करिती वशं[१०] मन्मथ[११]-विमुखांतें॥२१॥

दिंड्या.

त्यजुनि जाती परिभुक्त-मंजरींतें ।
भोगिती अलि उत्फुल्ल-मल्लिकेतें[१२] ।
मलिन[१३]-चंचल-वृत्तिंची प्रीति एकीं
राहणें, हें अति कठिण असे लोकीं ! ॥ २२ ॥

लता पुष्पित उपमर्द[१४]सहा भृंगा, ।
बहुत असती त्यांशीं च करीं संगा ।
मुग्ध[१५] अस्फुट-पुष्पा हि असे बाला ।
अकालीं रे भोगिसी मल्लिकेला ! ॥ २३ ॥

---

१ मदन. २ तरुणी. ३ अभिमान. ४ भ्रमर. ५ लतांचें जाळें. ६ जमा होतात. ७ मासोळ्या. ८ भूषणशब्द. ९ फुलांतील पांढरा, पिवळा अर्गजासारखा पदार्थ. १० स्वाधीन. ११ मदन. १२ मोगरा. १३ मळकट, पापिष्ट. १४ दांडगाई. १५ सुंदर.

काव्य १८३

शार्दूलविक्रीडित.

*हा भृंगा मधु[1]पान-सक्त सुरसा हर्षें धरी मंजरी ।
आत्माराम करूनि गार बसतो पुष्पोद्भवीं पिंजरीं ।
जातो गात, सुगंध घेत फिरण्या बैसे शिरीं कौंजरीं[2]
कुंजीं[3] खेळुन सुंदरी[4]-सह पुढें कंजीं[5] पडे पंजरीं[6] !॥२४

दिंड्या.

आम्रतरुं-वर पिक[7] मधुर काय गाती
"असा तरुवर जगिं नान्य" हे सुकीर्ति ?
बोध लोकां करिती च कीं अहो ते ।
मधुरवचनें प्रियता च जगीं होते ॥२५॥
पा[8]दपांतर सोडून रसालीं तें ।
गाति कोकिल मृदु पंचमस्वरातें ।
[9]तो हि कलिका रोमांच उभारूनी ।
रसिकं करि त्या सानंद पहा ज्ञानी ॥ २६ ॥

शार्दूलविक्रीडित.

पांथांनो, स्वगृहांस जाउनि तुह्मी द्या स्त्रीजना धैर्य रे ।
माना सोडुनि मानिनी, प्रियकरां संतोषवा जा त्वरें ।
आला हा स्मर[10]रांज सोडित पहा बाणां वियोगा[11]तुरीं ।
का[1]मांचे पिकदूत सर्व मनुजां[12] कीं सांगती यापरी ॥२७॥

आर्या.

कोकिल रसालशिखरीं, स्वगुणीं विख्यात होतसे तैसा॥
कुलीन सात्विक मानव,समयीं स्वगुणांस दावितो जैसा२८

---

*यांत चैनी पुरुषाचें चरित्र दाखविलें आहे. १ पुष्परस, मद्य. २ हत्तीच्या. ३ लतांची गर्दी. ४ भ्रमरी. ५ कमल. ६ पिंजरा (कमलरूपी पिंजऱ्यांत.) ७ कोकिल. ८ अन्यवृक्ष. ९ रसाल (आम्र.) १० मदन. ११ विरह्यावर. १२ मनुष्यांस.

साकी.

धरणीवरतीं अनेक तरुवर असती बहूपयोगी ।
आम्राच्या परि गुणी न सकलां सुलभ हि पैर भूभागीं २९

शार्दूलविक्रीडित.

बागेमाजि दुजा सुशोभित तरू नाहीं च आम्रापरी ।
ज्याची कोमल पालवी झणि मना सर्वांचिया ते हरी ॥
ज्याचा मोहर ओढुनि स्थिर करी भृंगांस गंधानिलें ।
आम्ल स्वादु तशींच मिष्ट सुरसें संपूर्ण ज्याचीं फळें ३०

वसंततिलका.

उद्यानमंडप जणूं घन आंबराई ।
छायाफलादि करुनी बहु तोष देई ।
संपूर्ण-जंतु-मन वेधि असा प्रवीण ।
आहे दुजा क्षितिवरी तरु सांग कोण ॥ ३१ ॥

शिखरिणी.

पलॅाशाचीं झाडें कुसुमित कशीं लाल दिसती ।
जसे कंदर्पाचे शर भरित रक्तें च गमती ।
वनश्री नेसूनी वसॅन नटली लाल जणुं ती ॥
सुरंगानें शोभे रुचिर सुकुमारी ऋतुमती ! ॥ ३२ ॥

वसंततिलका.

पुष्पें पलाशतरुचीं च गमून भृंग ।
जाती तदा शुकमुखांवरि हे सवेग ।
हीं जांभळें च अॅलि आलिं अशा भ्रमें कीं– ।
राघू तयांस धरण्या बघती विलोकीं ! ॥ ३३ ॥

---

१ दुसरा. २ सुगंधयुक्त वायूनें. ३ प्राणी. ४ पळस. ५ वस्त्र. ६ राघू. ७ भ्रमर.

शार्दूलविक्रीडित.

रेरे किंशुक, किंशुका भुलवुनी हो लाभ, सांगे मला ।
खासा दाविशि पुष्परंग परि त्या देशी न तूं सत्फला ॥
नादीं लागुं नकोस तूं शुकवरा, जा अन्य-वृक्षावरी ।
दावूनी वर रंग नीच फसवी अन्यास बा, यापरी! ३४

दिंड्या.

लता हर्षित सुमवृष्टि करिति पाहीं ।
मदनबाण चि सुटताति काय दाही ? ।
पुष्पशय्या रचिल्या च ठायठायां ।
वसंतें स्मरमित्रास आदराया ॥ ३५ ॥

कितिक चंपक उत्फुल्ल पीतपुष्प ।
अशोक हि किति आरक्तसुम अमूप ।
गुलाब हि किति मोगरे बकुलमाला ।
कितिक रंगां दावितो ऋतु अमोलां ॥ ३६ ॥

वसंततिलका.

हे पालवी न च तरूवरि रक्त आहे ।
अस्पष्टबोल उठतो अलि शब्द नोहे ।
स्वांगीं किती झुलति हे तरु थोर वातें ।
शाखी[२] हि मत्त मधु[३]सक्त किती अहो ते! ॥३७॥

हे गायकप्रवर[४] गाति सुगीत भृंग ।
मागूनि सूर किति देति तयां विहंग[५] ।
वीणा पिकध्वनि घुमे कलवाक्[६] मृदंग ।
कंदर्प मित्रमधु हे श्रवणांत दंग! ॥ ३८ ॥

---

१ काय. २ वेदशाखायुक्त (ब्राह्मण) वृक्ष. ३ मद्य, वसंत. ४ मुख्य. ५ पक्षी. ६ पारवा.

हे नाचती रुचिर[1] मोर समोर फार ।
ज्यां बर्हें[2] रम्य फुटले नव चित्र[3] थोर ।
जाणों बघून शिखि[4]नृत्यकला वसंतें ।
हा अर्पिला च नवरत्नकलाप[5] यांतें! ॥ ३९ ॥

स्रग्धरा.

वायूची मंद वाहे झुळुक, खुलतसे कोंवळी पालवी ती ।
पुष्पांचा गंध मार्गीं सकलमन हरी गोड अंजीर होती।
चित्तानंदी पिकांचा निनद[6] झडतसे पंच[7], पंचेंद्रियांतें[8]—
मोहाया एककालीं, मधु जणुं उपदा[9] पंचबाणा करी ते ४०

मंदाक्रांता.

द्राक्षावेलींवर लटकले घोस खासे सुपर्वीं[10] ।
अंजीरांचे तरु फळभरां दाविती काय गर्वीं ।
कोठें रंभा[11] फलभरनता[12] काकड्या थंड आणि ।
दाडिंबाम्रप्रचुर मधु तो भेट कामास आणी ॥४१॥

शिखरिणी.

गुलाबाच्या रांगा विकसित कशा रम्य सगळ्या ।
सुमल्ली संफुल्ला मधुर गुलनारीं स्फुटें[13] कळ्या ॥
फुलें नानारंगी रुचिर मरवा पाच हिरवा ।
तृतीया[14] ही आणी सुरभि उपदा सुंदर नवा ॥ ४२ ॥
सुरूंचे पेरूंचे सुतरु हिरवे गार फुटती ।
सुपारी–केळींचीं बहु सरळ झाडें विलसती ।
चकोत्रे संत्रे ही अननस सुदाडिंब बकुळी ।
प्रफुल्ला त्या वल्ली विलसति फुलें लाल पिवळीं ॥ ४३ ॥

---

१ सुंदर. २ पिसें. ३ अनेकरंगी. ४ मोर. ५ नवरत्नांचा अलंकार. नवरत्नांसारखीं पिसें. ६ शब्द. ७ झुळक इ० पांच. ८ त्वचा, दृष्टि, नासिका, जिव्हा व कर्ण. ९ भेट. १० कांडोकांडीं. ११ केळी. १२ वांकलेल्या. १३ प्रफुल्लित. १४ तिसरी.

सं. काव्य १२५



वसंततिलका.

वासंत वायु नटतो जणुं काय कामी।
सौगंध्य सुंदर फुलांतिल घेत नामी–
जाई हळू च तटभिंति चढून वेगें।
कांतां[1]बरीं[2] करि विहार तदा सुरंगें[3] ॥ ४४ ॥

शिखरिणी.

वसंतस्वामीचें प्रकटन[4] बघूनि प्रकट तें।
वनश्री लाजूनी किसलयपटें[5] कीं च नटते।
अलिश्रेणी[6] वेणी सुतनुवर[7] भूषा सुमतती[8] ॥
स्वसौंदर्यें ऐशा विकसुनि हरी चित्त झणि ती! ॥४५॥

मालिनी.

सशरधनु[9] मनोजा घेउनी त्वां सहाय।
बहु पथिक वियोगी मारिले दीन हाय!!!।
ऋतु[10]! तुज घडला हा दोष मोठा च आहे।
सितकुसुमयशीं[11] रे डाग भृंगालि[12] राहे! ॥ ४६ ॥

## प्रभातवर्णन.

उपजाति.

निस्तेज शुभ्रांशु[13] दिसे प्रभातीं।
सुधी[14]-पुढें अज्ञ[15] जसा विकांति[16]।
प्रदीप शोभालव[17]-हीन तैसे।
निष्किंचनांचे[18] गुण तुच्छ जैसे ॥ ४७ ॥

---

१ सुंदर, स्त्रिया. २ आकाश, वस्त्र. ३ प्रीतीनें. ४ आविर्भाव. ५ पल्लवरूप वस्त्र. ६ भ्रमरपंक्ति. ७ शरीरावर. ८ पुष्पपंक्ति. ९ धनुष्य बाणसहित. १० ऋतु, हें संबोधन. ११ शुभ्रपुष्परूप यशाचेठायीं. १२ भ्रमरसमूह. १३ चंद्र. १४ विद्वान्. १५ मूर्ख. १६ निस्तेज. १७ निस्तेज. १८ भिकारी.

मंदाक्रांता.

तारा[1] होती विरल समयीं[2] लोक निःशौर्य जैसे ।
जाई तेव्हां तिमिर[3] पळुनी देखतां चोर तैसें ।
होई सारें नभ शुचि[4] जसें साधुहृत् कीं[5] सुहंस ।
जाई रात्री त्यजुनि मनुजां श्री जशी आळशांस ॥४८॥

उपजाति.

सुकून जाती कुमुदें[6] प्रभातीं ।
संफुल्ल होती कमलें किती तीं ।
चंद्रास्त सूर्योदय या द्वयातें ।
करी, पहा दैवचरित्र हो तें! ॥ ४९ ॥

आर्या.

प्रातःकालीं प्राची[7], पिंगटरुचि[8] सत्य गर्भिणी वाटे ।
*प्रसवे रविरत्नातें, निषिद्धदर्शन ह्मणून कीं मोठें॥५०॥

दिंडी.

सुटति थोरांच्या जन्मकाळिं लोक ।
बंदिमध्यें असतात जे अनेक ।
कमलबंधापासूनि भृंग मुक्त ।
भीरु[9] सुटती प्रिय-बाहु-बंध-सक्त[10] ॥ ५१ ॥

शार्दूलविक्रीडित.

आकाशामधुनी पडो जलनिधीमाजी[11] रवी वा बुडो ।
जावो वा परलोकिं शूर लढण्या, ध्वांतासुराशीं[12] भिडो ।

---

१ नक्षत्रें. २ अणीबाणीची वेळ. ३ अंधार. ४ स्वच्छ. ५ किंवा. ६ चंद्रविकासी कमलें. ७ पूर्वदिशा. ८ कांति * उदयकालीं सूर्यदर्शन घेऊं नये असें शास्त्र आहे. ९ स्त्रिया. १० पतीच्या बाहूमध्यें गुंतलेल्या. ११ समुद्र. १२ अंधकाररूप दैत्य.

प्रथम ९२५
प्रथम ९२५



देऊनी क्षिति[1]भृच्छिरीं अहे[2]रहः पादें[3] प्रकाशे च हा ।
तेजस्वी न ढळे जरी हि विपदा येती तया दुःसहा ॥५२॥

वसंततिलका.

ते अद्रिराज शरणागत अंधकारा ।
कीं स्वोदरीं दरिंत रक्षति देति थारा ।
येतां रवी धरिति पाद शिरीं तयाचे ।
तो त्यां करीं अभय दे सुजनत्व साचे ॥५३॥

आर्या.

रक्त[4]पटावृतपूर्वा, चुंबी आलिंगि सूर्य रागानें ।
देखुनि त्यातें ऐसें, श्यामा[5] गेली रुसून रागानें ॥ ५४ ॥

दिंड्या.

वियोगानें रात्रिच्या खिन्न झाली ।
पद्मिनी[6] ते पाहूनि अंशुमाली[7] ।
पादपतनें[8] सानंद करी तीस ।
सत्य होती प्रिय नम्र मानिनींस[9] ! ॥ ५५ ॥
नविन [10]नलिनीसंगास लुब्ध[11] होई ।
कुमुदिनी[12] अलि सोडून शीघ्र जाई ।
तद्वियोगासहमान[13] फिरे मागें ।
भ्रमे स्त्रीद्वययुत[14] जेवि उभयरागें[15] ॥ ५६ ॥

---

१ पर्वत. २ पायकिरण. ३ पाय. ४ रक्तवस्त्रानें आच्छादित (पूर्व दिशा सकाळीं लाल असते.) ५ सोळा वर्षांची स्त्री रात्र. ६ सूर्यविकासी कमलिनी. ७ सूर्य. ८ पाया पडणें, किरण पाडणें. ९ अभिमानी स्त्री. १० नविन प्रफुल्लित कमलिनी. ११ लोभी. १२ चंद्रविकासी कमलिनी. १३ त्या कुमुदिनीच्या विरहास सहन न करणारा. १४ दोन स्त्रियांनीं युक्त. १५ दोघींवर प्रीति असल्यामुळें.

कुंदचंदन मकरंद घेत येई ।
जलावरुनी स्वच्छंद मोदं देई ।
मधुपवृंदा करि अंध सुगंधांहीं ॥
वात ऐसा सुखकंद मंद वाही ॥ ५७ ॥

साकी.

प्रात:काल च उद्योगाला उत्तम हा गणिलाहे ।
जिकडे तिकडे सुंदर शोभा झुळु झुळु झुळूक वाहे५८

दिंडी.

वसंतांतिल उत्तमीं चैत्रमासीं ।
मुदित असती सकल ही ग्रामवासी ।
शीघ्र उठती सानंद पाडव्यासी ।
नित्य-कृत्या-धिक काम करायासी ॥ ५९ ॥

साकी.

सासुरवाशी झाडुनि बाला गोमयमिश्रित पाणी-
करुनी अंगण सिंचिति झुणु झुण वाजे कंकणपाणी६०

शार्दूलविक्रीडित.

गेली ती क्षणदा सुखोत्कटभरामध्यें यथार्था खरी ॥
त्यायोगें सुमुखी-विशालनयनीं लाली दिसे ती बरी ।
वाटे कीं हरिणाक्षिबाण मदनें आकर्ण ओढून ते ।
भर्त्याचें मन भेदिलें ह्मणुन हो रक्तोक्त झाले च ते! ६१

साक्या.

तापट झटपट खटपट रामा कामाची करितात ।
पाहुन लुटपुट हटबिट सोडुन मठवासी होतात! ६२
अनेक अपुल्या प्रपंच-कामा करिती झटून रामा ।
त्या दिवशीं जन अत्युत्साहें करिती विशेष कामा ६३

---

१ आनंद. २ रात्र. ३ क्षणाप्रमाणें वाटणारी. ४ कर्णापर्यंत ( आकर्ण नेत्रत्व हें उत्तम स्त्रीचें लक्षण.) ५ रक्तानें भरलेले.

शेला पेला पाला गांठीं गाठी मोठी काठी ।
उंच गुढीतें उभारिती जन हौसें दिसण्यासाठीं ॥ ६४ ॥
प्रतिगृहिं ऐशी ध्वज-पंक्ती ते दिसते शोभित भारी ।
तीतें वरती बघती ह्मणती गंमत बालें सारीं ॥ ६५ ॥
सुखकर व्हावा नूतन वत्सर ह्मणुनी तत्सन्माना- ।
करिण्याकरितां ध्वजारोपणा करिती जन हें माना ६६
पुरुष मंगलस्नाना अटपुनि करिती नित्यविधीला ।
भूषणवस्त्रें धारण करुनी शोभविती देहांला ॥ ६७ ॥
पंचांगासम भविष्यकथण्या नाहीं शक्ति परासे[2] ।
ऐकत बसती उत्कंठेनें सबाल मानव त्यास ॥ ६८ ॥
लिंबदलांचें मरीचिपंचक[3] मिश्रित करुनी चूर्ण ।
भक्षण करिती होतें प्रशमन रोगांचें संपूर्ण ॥ ६९ ॥
पक्वान्नादिक भोजन करुनी तांबूलातें घेती ।
चित्तानंदी सुखकर लीला करुनी हर्षित होती ॥ ७० ॥

मंदाक्रांता.

श्रीमत्सीतारमणविभुचा[4] उत्सवारंभ होई ।
वर्षारंभीं, ह्मणुनि करिती लोक थाटास घाई ।
चित्रें भिंतींवरि बहु चुना देउनी काढवीती ।
हंड्या झाडें मधुन झुंबरें देवळीं लाविताती ॥ ७१ ॥

साक्या.

दिवसा पूजन भोजनपंक्ती पुराण-वाणी आणि
रात्रीं दीपावलिची शोभा कीर्तन कोठें गाणीं ॥ ७२ ॥
नवदिन ऐसा थाट जमूनी राहे उत्साहाचा ।
नवमी दिवशीं शोभा फारचि उदय श्रीरामाचा ॥७३॥

---

१ गाठ बांधून ( गाठींत ). २ अन्यास. ३ पंचांगोक्त ( मरिचिलवणं हिंगु इ० ). ४ रामचंद्र.

दिंडया.

जन्म-दिवशीं श्रीराममूर्ति-शोभा ।
फार; तीवर नववस्त्रभूषणाभा[1] ।
पुष्प-माला शोभती तुरे थाटें ।
दर्शनाला गर्दी हि तेथ दाटे ॥ ७४ ॥

जात असती देवळीं लोक वाटे ।
वृद्ध बालक आणीक नीच मोठे ।
करुन गर्दी खातात दांड सोटे ।
कितीकांचे होतात तेथ तोटे ॥ ७५ ॥

नटुन येती सुंदरी प्रौढ बाला ।
विभुद्वारीं पावती फार हाला ।
प्रयासानें जाऊनि आंत रामो[2] ।
नमुन भावें अर्पिती भेट रामा ॥ ७६ ॥

किती भक्त श्रीरामदर्शनासि ।
आणि चैनी तो थाट पाहण्यासि ।
छानछोकी कित्येक दाविण्यासि ।
येति विषयीं सुंदरी पाहण्यासि ॥ ७७ ॥

कीर्तनाचा तो थाट चाललाहे ।
रामजन्मा क्षण एक राहिलाहे ।
त्वरित करिती जन सर्वतयारीतें ।
सज्ज ठेवुनि बंदुका नौबदी ते ॥ ७८ ॥

स्वागता.

घेइ जन्म अज[3] राघव-वंशीं ।
क्रीडतो नट जसा बहुवेशी[4] ।

---

१ कांति. २ स्त्रिया. ३ विष्णु. ४ बहुरूपी.

साधुरक्षक धरी अवतारा ।
दुष्ट नाशुनि जना करि थारा ॥ ७९ ॥

उपजाति.

कृपें जनांचा भव[1]बंध तोडी ।
तो राम जन्मीं धरितो हि गोडी ।
पराक्रमें राक्षस-खोडि मोडी ।
भक्तांस देई सुख-मोक्ष जोडी ॥ ८० ॥

चामर.

[2]रामचंद्र शुभ्रकीर्ति निष्कलंक शोभतो ।
सेवकां ससीत[3] सर्वकाल सौख्य देइ तो ।
सर्वदा क[4]ला-समृद्ध हा नसे कधीं उणा ।
नित्य भिन्न राहतो जडां[5]हुनी पहा गुणां ॥८१॥

शिखरिणी.

विकासातें पावे कु[6]वलय जयांच्या[7] प्रगटनीं ।
त[8]मोभेदीं[9] कीर्ति प्रसृत बहु आहे त्रिभुवनीं ।
[10]नं दीनाचा बंधु द्विजपति हि दोषाकर असे
पदार्थी रामाच्या पडुनि हरि दोषा तम तसें ॥ ८२ ॥

---

१ संसार. २ राम शुभ्रकीर्ति असून निष्कलंक, चंद्र तसा नाहीं सकलंक आहे. राम सीतेसहित सर्वकाल सुख देतो, चंद्र शीतासहित सर्वकाल सुख देत नाहीं, उन्हाळ्यांत मात्र देतो. राम सदा कलायुक्त, चंद्राच्या कला कमी होतात=उणा होत जातो. राम जड पदार्थाहून भिन्न, चंद्रहा जडयुक्त ( ड आणि ल हे अभिन्न मानितात. ) चंद्र जलमय आहे. ३ सीतेसहित, शीतानें युक्त. ४ ६४ व १६ कला. ५ जड पदार्थाहून, जलाहून. ६ भूमंडळ, कमल ७ राम आणि चंद्र, ८ अज्ञान, अंधकार. ९ नाशनाविषयीं. १० राम, दीनांचा बंधु=पालन करणारा व द्विजपति=ब्राह्मणादि जातींचा स्वामी आहे. चंद्र द्विजपति=( ब्राह्मणांचा राजा ) असून

दिंडी.

असा अगणित गुणसंघ राघवाचा ।
सर्व कथण्या असमर्थ शेषवाचा ।
राममूर्ती घालूनि पाळण्यांत ।
कीर्ति गाती हरिदास हालवीत ॥ ८३ ॥

साकी.

गुलाल कुसुमें श्रीरामावरि टाकिती जन आनंदें ।
जयजयकारें वाद्यांच्याही भरतें नभ तैं नादें ॥ ८४ ॥

भुजंगप्रयात.

तदा वाजती भेरि वाद्यें अनेक ।
तसे बंदुकाशब्द होती कितीक ।
तयांचा मिळूनी महाशब्द होई ।
दिगंतीं प्रभूत्पत्ति-वार्तेस नेई ॥ ८५ ॥

दिंडी.

ह्याप्रकारें तो थाट संपवीती ।
टाळ झांजा ढोलांस हातिं घेती ।
काढिती मग सानंद लोक दिंडी ।
उंच गाती हरिनाम घेत झुंडी ॥ ८६ ॥

आर्या.

ओव्या अभंग गाती, नाचत येती सहर्ष माघारीं ।

---

दीन (विरही) यांचा बंधु ( संतोष देणारा ) नाहीं. म्हणून दोषांचा आकर=खाण आहे. म्हणून रामाच्या पदाच्या अग्रीं पडून ( आपल्या विरहि-तापद ) दोषांस तसेंच तम=अज्ञान यास हरी=घालवी. चंद्र नदीन=समुद्र याचा बंधु=हर्ष करणारा=चंद्रोदयानें समुद्रास भरती येते. दोषा=रात्री ( हीतें ) कर=प्रकाशित करणारा असे. रामाच्या पदाग्रीं=राम या पदाच्या अग्रीं= पुढें पडून=राहून (रामचंद्र) दोषांला व तमाला हरी=दूर करी (रामपदापुढें असल्याचें हें सामर्थ्य).

तेथें अरती करती, होती संतुष्ट राघवागारीं ॥ ८७ ॥

मंदाक्रांता.

भिंती हर्षें प्रथम सुमुखी शुभ्र त्या रंगवीती ।
उल्हासानें रुचिरें[1] लिहिणीं सुंदरी काढिताती ।
रंगें पूर्णा सुबक धरिती वामहस्तांत वाटी ।
तूलें[2] युक्ता शिळक रमणी दक्ष[3]-हस्तांत बोटीं ॥ ८८ ॥
[4]कार्याठायीं गुण उमटती कारणांचे अशी ही ।
विद्वद्वाणी अवितथ[5] असे वाटते ते मला ही ।
नीचा[6] काडी गुण[7]-जनि-युतार्युक्त[8] झाली पहा हे ।
उत्पत्तीला तिज गुणवती कारणीभूत आहे ॥ ८९ ॥
दोषांनें[9] ते प्रगटकरिते कंजनेत्री गुणांला ।
ऐसें बालासम बल कुठें पाहिलें काय? बोला ।
दोषां मागें त्यजुन गुणसंबंध[10] अशीं च राहे ।
लक्षीं येतें लिहितअसतां सुंदरी सर्व पाहें ॥ ९० ॥

साक्या.

वांकुनि निरखुनि मृगशावाक्षी[11] भिंतींवर लिहिताति ।
पटपट टिपके देऊन इकडुन तिकडुन त्या मिळवीति९१
स्वस्तिक, गोपुर, चित्रविचित्रित वेलांतें काढीती ।
अनेक रंगां भरूनि त्यांप्रति झकझक त्या खुलवीती९२

---

१ सुंदर. २ कापूस. ३ उजव्या. ४ यांत कारण गुणवती व कार्य गुण (लिहिणें) प्रगट करणारी काडी, तीस गुण—जनि=कापूस लावून तयार करण्यास गुणवतीच होय. ५ खरी. ६ हलकी. ७ गुणाच्या (लेखनादि) जनि=उत्पत्तीनें युक्त. गुण=दोरा, त्याची आहे उत्पत्ती ज्यापासून अशा कापसानें युक्त (काडी). ८ योग्य. ९ खोड, हात. १० सद्गुणसंबंध, कापूस. ११ बालहरिणासारखे नेत्र ज्यांचे.

दिंड्या.

विधात्याचें कौशल्य नेत्र-कर्मी ।
मृगाक्षीला लेखनीं होय नामीं ।
सूक्ष्मकरणीं चातुर्य कटीठायीं ।
सिंहकटिला होतसे क्लेशदायी ! ॥ ९३ ॥
सकल लिहिणीं काढिती अशा रीती ।
झटुन करिती मग सर्व तयारी ती ।
इतर वस्तू चित्रादि मेळवीति ।
हळदकुंका सुदिनीं च करीताति ॥ ९४ ॥

कटाव.

चैत्रीं हळदीकुंका हौसेनें करिती रामा ॥ ध्रु० ॥ हळदीकुंकाला दरसाला, चैत्रीं मासीं करिती अबला, हास्यैंकरुनी प्रफुल्लगल्ला, सायुध कंदर्पाचा किल्ला, तेथुन मन्मथ करितो हल्ला, रात्रीं घेती पतिचा सल्ला, मग त्या गुंफिति मल्लि-माला, गुणहीनांला सगुण साजरे, करिती हर्षं सुरेख गजरे, प्रियांकडूनी सांगुन गुज रे, हंड्या झाडें लाविति झुंबरें, टांगविती ही राघूपिंजरे, वनीं धाडिले येती हुजरे, आणुनि पल्लव करिती मुजरे, कैऱ्या लोंबति ज्यांना ऐसे, द्वारीं गेहीं खोंविति सोसें, अंब्याचे ते डहाळे खासे, यापरिच्या उत्साहें करिती हो अपुल्या कामा । चैत्रीं० ॥ १ ॥ दिवाणखाना करुनि स्वच्छ, काढिति रांगोळीतें स्वेच्छ, सुंदर सवत्स धेनूत्पुच्छ, तशाच वेली सपुष्प गुच्छ, दशावतारां समत्स्यकच्छ, त्यांतिल नाहीं एक हि तुच्छ, चौरंगावर सुरेख पाटा,

---

१ विशालनेत्रत्व हें लिहिणें काढण्यास चांगलें; व वांकून लिहिण्यानें कमरेस कळ लागते म्ह० सिंह कटित्व दुःखकारक.

मांडुनि त्यावर करिती थाटा, घालुन रंगित दुशालजोडी, एकीमेकी करिती तोडी, डोल्हाऱ्यामधिं ठेविति जोडी, गौरीशांची ज्यांना गोडी, असेल दुसरी तरि ती थोडी, कांहीं नाहीं अशांत खोडी, पक्वान्नातें ठेविति ठायीं, उंची मेवा आणि मिठाई, तबकें भरलीं नानासुफळीं, अंजिर पेरू द्राक्षें काळीं, गुलाबमोतीयांचे झेले, तांबूलाचें तयार केलें, सामानानें सुपूर्ण भरलें, खुले चौफुले खुलती ताटीं, मध्यें सामानाची दाटी, खुलती तैसे सुरेख अरशे, हस्तें गुंफित पंखे सरशे, तेथें नाहीं एक हि निरसें, कितीक कंवळीं पिंवळीं शेतें, कांहीं त्यांतिल हिरवीं भातें, सुंदर तैशीं अनेक चित्रें, दिसती धांवत जणुं कीं कुत्रें, वाघ सिंह मृग थोर लांडगे, अस्वल वानर हत्ति दांडगे, हुबेहूब कीं दिसती गाई, रमणी ह्मणती अहाग बाई!! कशि गडे गंमत दिसती आई, ह्मणती रामा आणि ताई, कितीक अणखी लीला रामांची खुलवी धामा। चैत्री० ॥ २ ॥

दिंड्या.

हौस भारी स्वगृहास शोभवाया।
नगरिं दासी धाडिती बोलवाया।
सौम्य होई रवितेज दिनीं जेव्हां।
भूषविति त्या स्वतनूंस फार तेव्हां ॥ ९५ ॥

पुसुन निर्मल करितात चेहऱ्यांतें।
अलंकारां त्यांतील ही हिऱ्यांतें।
सुवस्त्रांतें नेसती चापचोपीं।
भूषणांतें घालिती टापटीपीं ॥ ९६ ॥

शालिनी.

वारी शेलारीस नेसे नटून ।
रंगी[1] रंगी तें दुरंगी जपून ।
वेणी लेई रम्यवेणी फुटाणी ।
काशी हौशी उंचराशी मिराणी[2] ॥ ९७ ॥

साक्या.

नवें पार्वती कर्वति-कांठी आणी प्रियाकडून ।
पाहुन[2] ऐसें हट्टी राधा राधावळी रुसून ! ॥ ९८ ॥
गंगा गंगा-जमनी पातळ भर्जरि शालू भारी ।
नेसुन नटती संगमनेरी लालकिनारी नारी ॥ ९९ ॥

दिंडी.

रमा शोभे सुंदरी सार्थनामा[3] ।
उमा शोभे तैशीच रूपसीमा ।
वस्त्रभूषण-सौंदर्य-पूर्णरामा ।
हळदकुंका निघताति सौख्यधामा ॥ १०० ॥

मंदाक्रांता.

जोडे तोडे पद खुलविती गोठ तोडे करांला[4] ।
कंठा माळा सरि गळसऱ्या, कापबाळ्या श्रुतींला[5] ।
सर्जाची ती नथ खुलतसे नासिकाग्रीं सुतेजें ।
भूषा नागादिक बहु शिरीं फिर्किचें फूल राजे ॥ १०१ ॥

साक्या.

मोतीयांचे सुंदर गजरे, बुचड्यांवर घालीती ।
जरिच्या शाली शेले थाटें, अंगावरती घेती ॥ १०२ ॥
करूनि थाटा ऐशा खाशा, निघती हळदीकुंका ।

---

१ रंगित. २ मिराणी व राधावळी हीं लुगड्यांचीं नांवें आहेत. लक्ष्मीच. ३ सुखाचें घर (रामांचें विशेषण). ४ हात. ५ कान.

मार्गीं षोडशवर्षा गजगति, मोहित करिती लोकां१०३
मंद मंद पद उचलित गजगति, [1]सिंजितयुत टाकीती ।
[2]यौवनतुरगीं अनंग बसुनी, शिकवीं चाल जणूं ती॥१०४

मालिनी.

[3]छुम छुम चरणाग्रीं [4]नूपुरांचा सुनाद ।
बघुनि च करिती कीं कंकणें तीं विवाद ।
चपल हंसुन डोले पाहुनी चंद्रहार ।
[5]अवच [6]विमल[7]मुक्ता [8]त्यांस मानी [9]असार॥१०५॥

दिंडी.

स्तनावरणीं रमणींस असे चाळा ।
सारिती त्या पदरांस वेळ-वेळां ! ।
बातबेतें भूषणां गळा माळां ॥
नीटकरिती ओच्यांस पायघोळा ॥ १०६ ॥

साक्या.

सुहास्य वदनीं, चंचल लोचन, स्तन ते दिसती झेले ।
विलास गमनीं, रमणीयांगीं तारुण्य च कीं डोले !॥१०७
[10]हिरंण्यगर्भें [11]चारु सुवर्णें करुनि केले काय ! ॥
तेज:पुंज [12]स्वंगींचे ते गोरे दिसती काय ॥ १०८ ॥

---

१ भूषणांचा ( मासोळ्या वगैरे ) शब्द. २ तारुण्यरूप अश्वावर. ३ पायां-मध्यें मासोळ्यांचा नाद ऐकनच हातांतलीं कांकणें वाद करूं लागलीं ( तीं खणखण वाजतात हाच वाद ) चंद्रहार चमकतो तो जसा हंसतोच. मोत्यें मुकाट्यानें या सर्वांस तुच्छ मानतात. जे शहाणे ते कोणाच्या तंट्यांत बोलत नाहींत. ४ मासोळ्या. ५ मौनधारण करणाऱ्या (मोत्यांस शब्द नसतो). ६ निर्मल. ७ मोत्यें, साधु. ८ वरच्या सर्वांस. ९ तुच्छ. १० ब्रह्मदेव ( ज्याच्या जवळ सुवर्ण आहे). ११ उत्तम. १२ सुंदर आहे अंग ज्यांचें ( स्त्रिया ).

रामा कृष्णा[1] नाहिंत ठीकचि मग त्या श्यामा[2] कैशा ।
गौरतनू त्या अबला त्रिजगीं प्रबला होत सुकेशा १०८

वसंततिलका.

लावण्यकल्पलतिका च असे शुभांगी ।
शाखा सुबाहु मृदु गल्ल फुलें सुरंगीं ।
लोलाक्षिभृंग[3] हलती कुचसत्फलें कीं ।
देते सकामपुरुषा[4] फल इष्ट लोकीं ! ॥ १०९ ॥

उपजाति.

विद्युल्लता[5] कीं चुरुनी विधीनें[6] ।
विनिर्मिली योजुन ती सुधेनें[7] ।
त्रिनेत्र[8]दग्धस्मरजीवदात्री ।
संजीविनी औषधि कीं सुगात्री ! ॥११०॥

मंदाक्रांता.

चांचल्यातें[9] त्यजिति पद ते, सेविती नेत्र त्यांतें ।
श्रोणी कार्श्या त्यजित असती, घेतसे मध्य त्यातें[10] ।
ऐक्या टाकी उर, कुचें[11]-युगीं अद्वितीयत्व[12] थाटे ।
तारुण्यानें गुणविनिमया[13]-केलि केलीच वाटे ! ॥१११॥

मालिनी.

जशि जशि मग वाढे उच्चता ती स्तनांची ।
तशि तशि तरुणीच्या वक्रता लोचनांची ।
मलयुत[14] असती जे [15]अंतरीं, वृत्ति त्यांची—
सहन न करिते ती उन्नती हो परांची ! ॥ ११२ ॥

---

१ काळ्या. २ काळ्या, सोळा वर्षाच्या. ३ चंचल नेत्ररूप भ्रमर. ४ कामी. ५ विद्युद्रूप लता. ६ ब्रह्मदेवानें. ७ अमृतानें. ८ शिव. ९ चांचल्य. १० कार्श्यातें ११ स्तनद्वयाचे ठायीं. १२ एकत्व. विलक्षण-शोभा. १३ अदलाबदलीची केलि म्ह० क्रीडा. १४ काजळ, पाप. १५ मनांत, आंत.

दिंडी.

स्त्रियांचा तो चालतो मेळ वाटे ।
त्यांत तरुणी एकत्र, मेळ वाटे ।
गौर लिहिणीं बघण्यास थाट दाटे ।
खुलत थाटें आणीक चकचकाटें ॥ ११३ ॥

साकी.

ह्मणती खुग्रण आहे बाई फारच वेणूबाई ।
लिहिणें कैसें ठाकठिकीनें लिहिलें ही चतुराई ॥११४॥

दिंड्या.

मूठ दावी हांसून रमाबाई ।
ह्मणे, ह्मणुनिच आहे ग यांत बाई ! ।
हंसत तेव्हां वेणू सलज्ज होई ।
ह्मणे, तुमच्या इतकें ग नसे बाई ! ॥११५॥
गौल गम्मत चितूलेंग कत्या गाई ! ।
दूध पुकल देतात ह्या ग आई ! ॥
एक घेई खाईन दूध साई ।
मूल ह्मणतें आईस करुनि घाई ॥ ११६ ॥

साकी.

मग त्या बैठकिं बसती ऐटीं अंगीं ठेवण खाशी ।
रमणी-रमणीयांगोत्पादक विधि तो किति तरि हौशी !

दिंडी.

हळद देते धाकटी जाउ ओली ।
लाल कुंका लाविते वेणु भालीं ।
भरी ओटी घालून डाळ ओली ।
खिरापत दे खर्बूज-फोड केळीं ॥ ११८ ॥

साकी.

गुलाबपाणी सुगंधि अत्तर गजरे देई हातीं ।
मग त्या रमणी सुखकर भाषण बोलुनि निरोप घेती ॥

इंद्रवज्रा.

तेथूनि जाती दुसऱ्या गृहांतें ।
बोलावणें जेथिल होय त्यांतें ।
शोभा चि भिन्ना परि ती च रीति ।
सौभाग्यचिन्हें लसती सुकांति ॥ १२० ॥

साकी.

हळदीकुंका घेउन ऐसें हर्षें रुचिरकपोला[1] ।
सायंकाळीं लगबग लगबग जाती स्वीयगृहांला॥१२१॥

दिंडी.

अशारीतीं सौभाग्य-उत्सवातें ।
धरुन चित्तीं उल्हासि-वर्तनातें ।
एकदिवशीं बहु अन्य-दिनीं अन्या ।
करुनि होती आचैत्र वधू धन्या ॥ १२२ ॥

आर्या.

दैत्य हिरण्याक्ष बली, त्रस्त करी नरसुरां हिरण्य[2] हरी ।
स्तंभीं प्रगटे भगवान्, आश्चर्य च तो हि तैं हिरण्यहरी[3] ।
स्तंभोद्भव नरहरि हो, प्रऱ्हादातें प्रमोदभर करितो ।
संध्याकालीं हरि[4] हो, प्रगटुनि मारी हिरण्यमदकरि[5] तो

दिंडी.

माधवीं[6] जन सितचतुर्दशीला ते ।
नृसिंहाच्या करितात उत्सवातें ।

---

१ सुंदर गाल ज्यांचे. २ द्रव्य. ३ द्रव्य, हिरण्यकशिपु. ४ विष्णु. सिंह ५ हिरण्यकशिपुरूप मदकरी=मत्त हत्ती. ६ वैशाखमासीं.

[library stamp]

छतें हंड्या खुलताति बहु सभोंती ।
गीत वाद्यें पौराण कथा होती ॥ १२५ ॥

## संध्याकाळवर्णन.

वसंततिलका.

सूर्यास्तसंधि नि[1]कटावर नेटला तो ।
चंद्रोदय प्रिय दिसे अति नेटका तो ।
ते[2]जोद्वयें सुचविती जणूं काय लोकां ।
सर्वां असे उदय आणि तसा च धोका ॥ १२६ ॥

अस्ता[3]चलीं दिसतसे रविबिंब तैसें ।
शुभ्रांशु[4]बिंब उदया[5]द्रि-शिरीं विभासे ।
संध्या[6]प्रवृत्तशशि शेखरनृत्यकालीं ।
टाळापरी च दिसती जणुं तीं निरा[7]ळीं ! ॥ १२७ ॥

वसंततिलका.

तेजोद्वयें न बघण्या अरसे पुढारा ।
मांडून भूषविति दि[8]ग्रमणी शरीरा ।
कीं रौप्य होत तबकें भरलीं नगांनीं ।
कीं अंबु[9]जें च शिरिं खोंविलिं हीं [10]त्यांनीं ! ॥ १२८ ॥

शार्दूलविक्रीडित.

[11]संध्याश्रीरमणीश्रुतींतिल मणी हीं होत तेजोद्वयें ।
[12]अभ्रस्यंदन हा तदीय फिरती चाकें च हीं कीं [13]रयें ।

---

१ जवळ. २ सूर्य व चंद्र. ३ अस्तपर्वत. ४ चंद्र. ५ उदयपर्वत. ६ संध्याकाळीं प्रवृत्त=सुरू झालेले शशिशेखर=शिवाच्या नृत्यकाळीं. ७ वेगळालीं. ८ पूर्व-पश्चिम-दिक्स्त्रिया. ९ कमलें. १० दिक्स्त्रियांनीं. ११ संध्या लक्ष्मीरूप रमणी=स्त्री, तिच्या श्रुतींतील=कानांतील. १२ आकाशरूप स्यंदन=रथ. १३ वेगानें.

हंड्या ह्या जणुं लाविल्या विलसती कालें च दों बाजुंला ।
ईशें काल गणावया कृत जणूं कांटाच भासे मला १२९

वसंततिलका.

हे कालमापक जणूं कृत रत्नगोळे ।
हे विश्वकर्म बघती विभुचे च डोळे ।
दिङ्नारिंनीं उडविले जणुं हे पतंग ।
झुंजावयास खग[1] टाकिति हे सरागे[2] ॥ १३० ॥

दिंडी.

जरी भास्कर अ[3]नुरागयुक्त राहे ।
सौम्य किरणीं अतिसौख्य देत आहे ।
दिशा-वेश्या पाहून निर्व[4]सूतें ।
घालवी त्या तत्काल पहा हो तें ! ॥ १३१ ॥

उपेंद्रवज्रा.

भोगी सु[5]रागें सविता प्रती[6]ची ।
प्रचीति ऐशी बघुनी तयाची ॥
कृष्णानना तत्क्षण होइ पूर्वा ।
ईर्ष्या सपत्नीविषयीं च सर्वा ! ॥ १३२ ॥

शार्दूलविक्रीडित.

अस्ताद्रीवर लाल बिंब रविचें मोठें दिसे यापरी ।
कालें खड्गनिकृ[7]त्त मस्तक उडे कीं दै[8]न तें अंब[9]रीं ।
तेजोहीन ह्मणून होत पडतें सिंधूमधें तें पहा ।
काळा ठिक्कर तत्कबंध[10] धरणी-पृष्ठीं पडे कीं अहा ! ॥

---

१ पक्षी (सूर्य, चंद्र). २ सप्रेम-उदयास्तसमयीं दोन्हीं बिंबें लाल असतात. ३ प्रेम, लाली. ४ द्रव्यहीन, तेजोहीन. ५ लाली, प्रीति. ६ पश्चिम. ७ छिन्न. ८ दिवसाचें. ९ आकाश. १० धड.

दिंड्या.

दैव होतां प्रतिकूल धनें होतीं ।
विफल; तैशीं संपूर्ण साधनें तीं ।
पतनकालीं सवसूर्स[1] रक्षणाला ।
सहस्र हि कर[2] नुपयोगि त्या क्षणाला ॥१३४

सिंधु[3]माजी पडतो हि तो पतंग[4] ।
कमलमध्यें तैसे च मत्त भृंग ।
वृक्षकोटरमध्यांत ते विहंग[5] ।
तरुणहृदयीं अनुरक्त तो अनंग ॥ १३५ ॥

इंद्रवज्रा.

गेला ह्मणूनि प्रियमित्र[6] अस्ता ।
होताति दुःखी नलिँनी समस्ता ।
दुःसह्य कीं होउनि दुःख, कष्टी ।
अँभोजरूपा मिटिती स्वदृष्टी ॥ १३६ ॥

वसंततिलका.

आह्मां-समीप बघुनी मधुकोश पूर्ण ।
घ्याया करां[10] पसरितो द्विज[11]राज दान ।
लागो न यास दुसरा मधुचा कलंक ।
जाणून कोश मिटती नलिनी अनेक ॥ १३७ ॥

मालिनी.

दिनपतिगमनानें रागिणी[12] होइ संध्या ।
उपपति[13]-विधुसंगा जाय रात्रीं अबंधा[14] ।

---

१ किरण, द्रव्य ( यांनीं युक्त ). २ किरण, हात. ३ समुद्र. ४ सूर्य. ५ पक्षी. ६ सखा, सूर्य. ७ कमलिनी. ८ कमल. ९ पुष्परस. १० हात, किरण. ११ चंद्र. १२ प्रीतियुक्त, लाल. १३ चंद्र, जार. १४ मोकळी.

स्वपतिसह विरागा[1] अस्थिरा[2] वृत्ति ज्यांची ।
प्रमोद[3] भरित होती तद्वियोगें[4] चि साची ॥ १३८ ॥

साक्या.

अहर्निशांची[5] सीमा[6] संध्या माणिकशिला[7] च कीं हे ।
किंवा कालें छिन्न दिवसशिर ह्मणुनी रक्त च वाहे १३९॥
द्यावापृथ्वी यांचें अंतर लिप्त च सिंदूरें कीं ।
देवी-कृत-रवि-पूजन-कालीं अर्पित कुंकुम हें कीं ॥१४०॥

## वसंतेंदु-वर्णन.

आर्या.

उदया पावुनि राजा[8], हर्षानें स्वीय[9] मंडलीं[10] फिरतो ।
मृदुलकरीं[11] सुख देउनि, सकलजनस्वांत[12] मुदित तो करितो.
तेजस्वी बहु असती, तापद[13] कित्येक अल्परुचि[14] लोकीं ।
सौख्यद तो चि कलावान्[15] ग्रावद्रावैकदक्ष[16] अवलोकीं ॥

दिंड्या.

वसंतेंदु च तो एक सौख्यसिंधु ।
दिसे शोभित अंबरीं मदनबंधु ।
सकल होती सानंद जंतु-वृंद ।
दूर होती दर्शनें सर्व खेद ॥ १४२ ॥
दिशा शोभे माहेंद्र फार गौर ।
भूषणांहीं अत्यंत मनोहार ।

---

१ नाखुष. २ चंचल. ३ आनंद. ४ पतिवियोगानें. ५ दिवसरात्रींची. ६ शींव. ७ माणकाची शिळा ( शिंवेची खूण ). ८ राजा, चंद्र. ९ आपल्या. १० राज्यांत, आकाशमंडळीं. ११ कर, किरण. १२ चित्त. १३ सूर्य. १४ अल्पकांति (ग्रहादि). १५ कलापूर्ण. १६ पाषाणासही द्रव आणण्याविषयीं चतुर ( चंद्र प्रकाशानें चंद्रकांतास पाझर सुटतात ).

नीलकेशांमधिं घालि चंद्रकोर ।
हिरकण्या कीं तारा च ह्या अपार ॥१४४॥

इंद्रवज्रा.

तारा हिऱ्यांनीं नटवूनि अंगा ।
ये सुंदरी चेतविते अनंगा ।
आलिंगितो देखुनि सुंदरांगी ।
ऐंद्री-वधूचुंबित चंद्र रागी ॥ १४५ ॥

दिंडी.

साह्यकारी कंदर्पराज-याचा ।
आणि जीवन शृंगार या रसाचा ।
सौम्यदर्शन जो इंदु कुमुदबंधु ।
तापहारी स्वोदयें सौख्य-सिंधु ॥ १४६ ॥

मालिनी.

सुरुचिर रजनीच्या तारकादृङ्मुखातें ।
लगटुनि अतिहर्षें चंद्रमा चुंबितो तें ! ।
वसनतम गळोनी रात्रिचें तें च जाई ।
सकलतनु तियेची गोर ते व्यक्त होई ! ॥१४७॥

शार्दूलविक्रीडित.

चंद्रैणाधिप पूर्वदिग्गिरिदरी-पासून वेगें निघे ।
नीलाकाशवनोदरीं मृगंधर स्वच्छंदतेनें रिघे ।

---

१ पूर्वदिशा. २ स्त्री. ३ लाल, प्रेमयुक्त. ४ कमलें प्रफुल्लित करणारा. ५ सुखसमुद्र. ६ सुंदर. ७ रात्र. ८ तारका ( नक्षत्रें, डोळयांतील बाहुल्या ) च नेत्र त्यांनीं युक्त मुख. ९ वस्त्ररूप अंधार. १० एण=मृग, अधिप=स्वामी=सिंह ( चंद्रही एणाधिप आहेच ). ११ पूर्व पर्वत.

शत्रुध्वांत[1]करी कराग्रनखरीं गंडस्थळीं फोडिला ।
[2]तेणें त्यांतिल मौक्तिकें च पडलीं तारा जणूं निर्मला ॥
भेदी[3] कैरव[4]कोरकां[5]स तरुण स्वांतां[6]स तो हालवी ।
सुभ्रू[7]-मान समूल नाश करुनी सौख्यांत तो डोलवी ।
शुभ्रस्वच्छकरीं तमास कवळी अब्धीस आनंदवी ।
उष्णांशु[8]च्छ[9]वितप्त सर्व जगता शीतांशु[10] तो शांतवी॥१४९॥

प्रहर्षिणी.

वाटे तो दिनमणिसा वियोगि[11]देहा ।
शीर्षीं कीं मणि मदनाहि[12]च्या जणूं हा ।
शृंगारोदय मणि चंद्रशेखरा[13]चा ।
तारा[14]सन्मणि मणि ही असे नभाचा ॥ १५० ॥

दिंड्या.

निशासस्मित[15]मुख रम्य दिसे साचा ।
इंदु मौक्तिक कंदुक प्रिय रतीचा ।
लाविला कीं त्रैलोक्यमोहनाशी ।
नभश्रीनें तो तिलक निटिल[16]देशीं ॥ १५१ ॥
गगनरत्नाकर[17]रत्न शुभ्र किंवा ।
शुक्ति[18] मौक्तिकाभां[19]ची च शोभते वा ।
अभ्रवापीं[20]तिल पुंडरीक[21] ताजें ।
रतीचा कीं आदर्श इंदु राजे ! ॥ १५२ ॥

---

१ अंधाररूप हत्ती. २ उत्तम हत्तीच्या गंडस्थळांत मोत्यें असतात असा कविसंप्रदाय आहे. ३ फुलवी. ४ कमल. ५ कळे. ६ चित्त. ७ स्त्रियांचा अभिमान. ८ सूर्य. ९ ताप. १० चंद्र. ११ विरही. १२ सर्प. १३ शिव. १४ नक्षत्रांतील उत्तम रत्न. १५ हास्ययुक्त. १६ कपाळ. १७ समुद्र. १८ शिंप. १९ मोत्यांच्या कांतीची. २० आकाशरूप विहिरींतील. २१ शुभ्रकमळ.

वसंततिलका.

नीलोत्पलासम दिसे अतिनील अभ्र ।
शुभ्रांशु त्यावर दिसे च मराल शुभ्र ।
कीं अभ्रकुंजर च हा अतिधुंद साजे ।
योद्धा तमोरि विजयी वरतीं विराजे ! ॥१५३॥

दिंड्या.

मदनरायाचें छत्र शुभ्र जाण ।
तयाचें कीं फडके च हें निशाण ।
होय त्याचा हा अर्धचंद्रबाण ।
तदस्त्रां हा करि तीक्ष्ण गमे शाण ॥ १५४ ॥
तयाचें कीं तेजस्वि-चक्र खासें ।
रत्नमय कीं हे ढाल रम्य भासे ।
वक्र खड्ग च कीं होय हृदयिं खोंचे ।
तयाचा कीं शिरपेंच गमे साचे ॥ १५५ ॥
रात्रिरूपी व्याली च कृष्णकाया ।
विरहिदेहा करण्यास ही अपाया ।
जातसे कीं धुंडीत विरहि लोकां ।
तिच्या शिरिंचा मणि चंद्र असे तो का॥१५६॥

साक्या.

लक्ष्मीक्रीडातडाग शोभे आमृताची वापी कीं ।
गगनवल्लिचें सुपुष्प रतिचें सौध धवल विधु हो कीं ॥

शार्दूलविक्रीडित.

भूम्यभ्रांतरपात्रिं घालुनि दधिज्योत्स्ना तदा पांढरी ।
मध्यें मारुत-मंथदंड घुसळी घालूनि दिक्सुंदरी ।

१ कमल. २ हंस. ३ हत्ती. ४ अंधकाराचा शत्रु चंद्र. ५ मदनाच्या शस्त्रांस. ६ सहाण. ७ सर्पिणी. ८ तळें. ९ विहीर. १० बंगला. ११ पांढरा. १२ चंद्र. १३ वायु.

पात्राच्या वर बुद्बुद प्रचुर हे तारा न त्या निर्मला ।
वाटे हा नवनीत[1]-गोलक असे तत्सार इंदू मला ॥१५८॥

वसंततिलका.

तूं मस्तकी बसशि रे प्रिय होशि सांबा ।
चंद्रा, स्मर प्रियसखा असशी हि तूं बा ।
अन्योन्यशत्रु जरि हे असताति दोघे[2] ।
हो वागणूक तुझि त्यां प्रिय केशि सांगें ॥ १५९ ॥
जे शुद्ध निर्मल जगामधिं वागताती ।
सर्वांस ते तुजपरी प्रिय सत्य होती ।
हा लागला मग कसा तुजला कलंक? ।
तूं गांजितोसि विधुरांस[3] ह्मणून देख ॥ १६० ॥
तूं शंभुच्या निटिलिं बैसशि सर्वदा ही ।
नेत्राग्निची तुजशिं लागलि आंच बा ही ।
हा राहतो ह्मणुनि डाग तवांगिं देख ।
लोकां न हें समजुनी ह्मणती कलंक ॥१६१॥

मालिनी.

रजतमय[4] तुझी ही मूर्ति शुक्ती च खाशी ।
गवसलि गिरिजेच्या काजळाला विलासी ।
शिवदृगनल[5]दीपाच्या वरी भालदेशीं ।
लटकवि, बिलगे रे काजळी सत्य तूशीं ॥ १६२ ॥

इंद्रवज्रा.

आकाश हा क्षीरसमुद्र मायी ।
त्यामाजि निद्रा करि शेषशायी ।
हा शेष हो संकुचितांग चंद्र ।
हा अंक नोहे हरि हो सनिद्र! ॥ १६३ ॥

---

१ लोणी. २ शिव आणि मदन. ३ विरही. ४ रुप्याची. ५ नेत्राग्नि.

साकी.

गगनवल्लिचें प्रफुल्ल सित सुम विधु जणुं हा वरि भृंग ।
सुधामरंदा प्राशित बैसे, नकळुनि ह्मणती डाग॥१६४॥
मित्रास्तातें देखुनि होतो द्विजपति हर्षित वेगें ।
या दोषानें त्याच्या अंगीं कलंक अक्षय लागे ॥१६५॥

शार्दूलविक्रीडित.

कोणी अंक[1] तसा च पंक[2] ह्मणती सामुद्र[3] सारंग[4] ही ।
भूछाया पडते कितीक ह्मणती वाटे खरी युक्ति ही ।
गाढध्वांत[5]विषा गिळी प्रतिदिनीं त्या औषधीनाथ[6] हा ।
तेणें कुक्षित काजळापरि दिसे तो कालिमा हो पहा !

मंदाक्रांता.

कित्येकांतें फसवि च कलानाथ[7] याची कला ते ।
मार्जारांतें सुपय[9] गमुनी चाटिती चंद्रिकेतें[10] ! ।
स्वीयांगातें पिहित[11] करण्या सुंदरी सौध[12]भागीं ।
ज्योत्स्नां धौतांशुक[13] समजुनी ओढण्या जाति अंगीं॥१६७॥

साक्या.

न चंद्रिका हे कर्पूरानें घडिली रजतें किंवा ।
पाऱ्यानें कीं धौत; स्फटिकीं घटितें[14] स्वर्भूमी वा ॥१६८॥
कुमुदें[15] विकसित दिसती शोभित मध्यें शुधांशुकांती ।
कुलीन-सात्विक-सुशील-गेहीं जेंवि लसे संपत्ती॥१६९॥

मालिनी.

सुखद पवन चाले, चंद्रिका ध्वांतलोपी[16] ।
सुकृति[17] मनुज सौधीं मंचकीं रम्यतल्पीं ॥

---

१ कलंक. २ चिखल. ३ समुद्रसंबंधी. ४ हरिण. ५ अंधार. ६ चंद्र. ७ चंद्र. ( साभिप्राय. ) ८ प्रकाशरूप. ९ दूध. १० चांदणें. ११ झांकण. १२ गच्ची. १३ धौत=धुतलेलें, अंशुक=वस्त्र. १४ घडलेली. १५ शुभ्रकमलें. १६ अंधकार नाश करणारी. १७ धन्य.

सुखकर बहु लीला सुंदरीच्या सुयोगें ।
करुनि किति विलासी होति संतुष्ट संगें ॥ १७० ॥

वसंततिलका.

सौंदर्यपूर्ण दिसते रमणी मृगाक्षी ।
गौरांग, रंग सुमुखीं, निरखून लक्षीं[1] ।
मारी हगतं[2] जणुं ते स्मर-कुंतं[3] वेगीं ।
तत्काल विव्हल पडे प्रिय तो पलंगीं ॥ १७१ ॥

मालिनी.

झुळु झुळु झुळुका त्या चालती थंड रात्रीं ।
सुतनुरचित-वेणी-पुष्पगंधास[4] हर्त्री[5] ।
जणुं किं गजगतींची पाहुनी चाल खाशी ।
अनुकरिति[6] विनोदें काय त्या तद्गतीशी[7] ! ॥ १७२ ॥

---

## ग्रीष्मर्तु.

शार्दूलविक्रीडित.

अंगारीं[8] खचिलीच काय दिसते भूमी तसें अभ्र ही ।
वायू उष्ण सधूलि चालत असे व्यापूनि सर्वा मही ।
वापीमाजि[9] नदी-सरांत उदकें अत्यल्प उष्णोष्ण तीं ।
ग्रीष्मीं भास्करदाहकारकबृहद्वह्न्यनुपरी[10] तत्कृती ॥१७३॥
गेलें शीत कुठें कुठें निवसती हेमंत शीतांशु ते ।
कोठें मेघ परोक्ष[11]जलपकें[12] जडीं[13] संयुक्त जे नित्य ते ।

---

१ पतीवर. २ कटाक्ष. ३ भाले. ४ सुतनु स्त्रिया त्यांनीं रचित० घातलेल्या वेणी, त्यांतील पुष्पगंधास. ५ हरण करणाऱ्या. ६ अनुकरण करतात. ७ स्त्रियांच्या गतीस. ८ निखारे. ९ विहीर. १० अग्नि. ११ पाठीमागें. १२ बडबड करणारे. १३ आळशी, जल.

वार्त्याशब्दमिषें निदाघ[2] वदुनी फेंका[5] भू[6] वूळ[1] ती ।
शत्रूच्या वरि चाल भूमि-पतिची[3] दे त्रास अन्याप्रती १७४

साकी.

उष्ण-किरण बहु तापद होई त्यांत हि मध्यान्हांत ।
छाया ही ते व्याकुळ होउनि जाई कीं झाडींत !॥१७५॥

दिंडी.

किरणबाणीं रवि-भिल्ल हणी तीक्ष्ण ।
शीत-हरणें पावती फार शीण ।
किती लपती गेहांत अंधकारीं ।
किती विपिनीं पळताति दरीं खोरीं ॥ १७६ ॥

हरिणी.

दिनकरकरौघातें होतें विशीर्ण शरीर तें ।
म्हणुनि पळुनी जाई घाई करून च शीत तें ।
स्थळ हुडकितां होई लाही दडे सलिलांतरीं ।
जलगृहिं लताजालीं खोली-मधून लपे घरीं !॥१७७॥

वसंततिलका.

तप्ता मही विरहिवृत्ति-समान भासे ।
चंडांशु तापद करीं कु-नृपाळ जैसे ।
छाया न सोडि चरणास जशी सती ते ।
दीनत्व पांथ-वदनीं कृपणा-परी तें ॥ १७८ ॥

स्रग्धरा.

माध्यान्हीं उष्ण तापे चटचट तनुला म्लानता दाह फार।
वृक्षच्छायेंत मार्गीं नरपशु बसती टाकिती श्वास थोर।

---

१ वावटळ. २ ग्रीष्म. ३ ह्या वेळचा राजा ग्रीष्म. ४ सूर्य. ५ प्रहार. ६ पृथ्वी. ७ सूर्य.

झाडांच्या मध्यशाखा धरुनि बसति ते सावलीमाजि पक्षी।
पोटाखालील छायेमधुनि च पशुचीं बालकें जाति लक्षीं!

मालिनी.

प्रखर बहुत तापे उष्ण, तैं शोष लागे।
वनिं नर पशु पक्षी धुंडिती वारि वेगें।
पुसति बघति पाणी भाजि पायांस वाळू।
परि झणि न दिसे तें शुष्क हो कंठ तालू॥१८०॥
किति हुडकिति कूपा ते पथीं उत्कं[1] पांथ।
शत शत कर दोऱ्या सोडुनी त्यांत पाथें[2]।
बघति बहुत कष्टें नाल्प पात्रांत येई।
खडखड करतां तें पात्र ही भग्न होई॥ १८१॥

वसंततिलका.

मार्गीं सरें हुडकितां दिसती भयाण।
त्यांच्यांत पांथ जल धुंडिति ते सयानें[3]।
तेथें मिळे न जल चक्षुंस[4] लावण्याला।
भेगा प्रचंड दिसताति मधें तयांला॥ १८२॥
अर्थी निराश परतोन इथून गेले।
तेणें सरो-हृदय कीं च विदीर्ण झालें।
जें देइ जीवन[5] सदा पथिकांस वाटे।
दात्या न त्या जल मिळे उर कां न फाटे॥१८३॥
सकल विकल होती शोधिती थंड छाया।
क्षणभरि तिजमध्यें अल्प विश्रांति घ्याया।
विरल च परि मार्गीं ते दिसे वृक्षमूलीं।
शरण च तरुपादा तप्त होऊन गेली॥ १८४॥

---

१ उत्कंठित. २ जल. ३ यान=घोडें, गाडी, यांसहित ( कोरडीं असल्यामुळें). ४ डोळ्यास. ५ उपजीवन.

दिंड्या.

हरिण तापें वैक्लव्य[1] पावताति ।
थकुनि कंटकवृक्षांत बैसताति ॥
दुःख सात्विक पावती भाग्यहीन ।
नीचसेवा-करण्यांत जसे दीन! ॥ १८५ ॥
उष्ण चमके माध्यान्ह-काल होतां ।
जलाभासा करितें च तें पहातां ।
मृगजला मृग पाहून धांव घेती ।
तसे धांवत यमपुरीलागिं जाती! ॥ १८६ ॥

साक्या.

पशु पक्षी ते तापें विव्हल बसति तरुछायेंत ।
जिकडे तिकडे शून्य च भासे ग्रामीं आणि वनांत १८७॥
छाया-नायक[2] चंड[3] जाहला ह्मणुनी तत्स्त्री छाया ।
पति जाळील चि भयें जणूं या लपवी स्वकीय काया!

दिंडी.

नाग शिरण्या बघताति हस्तिसोंडीं ।
सर्प दर्पा[4] सोडून शिखि-शिखंडीं ।
निजच्छाया महिषीस पंकवाटे ।
ग्रीष्मकालीं उष्णांशु चंड वाटे ॥ १८९ ॥

वसंततिलका.

संताप देशि जरि तूं सकलां उदंड ।
याचा असे परि पुढें परिणाम गोड ।
बा उष्णता तुझि शिरे पृथिवींत राहे ।
तेणें मही फलवती न च अन्यथा हे ॥ १९० ॥

---

१ क्लेश. २ सूर्य. ३ रागीट. ४ गर्व. ५ मोर. ६ पिसारा.

शार्दूलविक्रीडित.

स्थानें दग्ध कितीक दग्धकरण्या आहेत बाकी किती ।
देखाया वणवा समुत्सुक चढे शुष्कद्रुमीं पर्वतीं ।
ज्वालाशब्दमिषें पहा खदखदां हांसे जणूं वाटतें ।
संघर्षोद्भव मित्रवायुसह तो पाही च कीं विश्व तें!१९१

इंद्रवज्रा.

दावाग्नि[1] पेटे बिलगे द्रुमाग्रां[2] ।
ज्वाला विशाला दिसताति उग्रा ।
ज्वाला न जिव्हा पसरून शाखी ।
संतप्त ते जीवन[3] मागती कीं ! ॥ १९२ ॥

मालिनी.

रज तृण बहु पानें घेउनी चक्रवात[4] ।
गरगर फिरुनी तो शीघ्र अत्युष्ण जात ।
कधिं लघु[5] कधिं मोठा सोट अत्युच्च होई ।
नर-पशु-विहंगांतें[6] देत संत्रास जाई ॥ १९३ ॥

शार्दूलविक्रीडित.

जातीनें लघु[7] हे रज:कण[8] जयां मोजी[9] न कोणी कधीं ।
पायांनीं जन नित्य ज्यां तुडविती घेशी शिरीं त्यां अधीं ।
चांपल्यें[10] क्षितिभृच्छिरीं[11] बसविशी लोकेक्षणां[12] पीडुनी ।
ते त्वदेह मलीन[13] पांसु[14] करिती वाता ! पहा लक्षुनी१९४॥

वसंततिलका.

वेगें प्रवात उलटासुलटा सुटून ।
ग्रीष्मांत भीतिकर होइ महा तुफान ।

---

१ वणवा. २ झाडांचे शेंडे. ३ पाणी. ४ वावटळ. ५ लहान. ६ पक्षी. ७ लहान, हलकट. ८ धूळ. ९ अगण्य, कोणी विचारीत नाहींत. १० घाईनें, अविचारानें. ११ पर्वत, राजे. १२ नेत्र. १३ मळकट. १४ रज:कण.

जाण्या समुद्रिं धजती न च तीं जहाजें ।
लाटा प्रचंड उठुनी जल फार वाजे ॥१९५॥

आर्या.

दुर्लभ तपतप्तातें झुळूक सीतल सुहर्षकारी ते ।
निर्धनसंसाऱ्यांतें सहसा जैशी धनाप्ति सुख करिते१९६॥

मालिनी.

तळमळ बहु, होई दाह, अंगास घाम ।
दिवसभर सुचेना कांहीं ही काम धाम ।
रुचि किमपि न अन्ना जाइ पाणी च फार ।
तनुवरि[2] तनुवस्त्रें[3] वाटती थोर भार ॥ १९७ ॥

वसंततिलका.

अत्युग्र थोर बहुतापद वासराचें ।
ग्रीष्मांत रूप बघुनी जणुं काय साचें ।
झाली भयें च रजनी कृश भीत भारी ।
भर्ता प्रचंड बघुनी जशि भीरु नारी ॥ १९८ ॥

साकी.

फुलें चंद्रिका जलमंदिर ही चंदनचर्चित योषा[4] ।
सीतलजल तनुवसनें वाळा ग्रीष्मि च देई तोषा॥१९९॥

मालिनी.

विकसितसुम[5]गंधादान, शीतांबु, आणी ।
जल-गृह, विधुकांती, सुंदरीची सुवाणी, ।
जल पडत सभोंती, बाग ही गर्द छाया, ।
करिल मग कसा तो ताप काया अपाया? ॥२००॥

इंद्रवज्रा.

औशीरताट्या सजला सभोंती ।
येई हवा त्यांतुन देइ शांती ।

१ ग्रीष्म. २ शरीर. ३ हलकीं. ४ स्त्री. ५ पुष्प. ६ ग्रहण. ७ वाळ्याच्या.

पंखा असे हालत आंत गार ।
तेथें तपाचा कुठुनी पसार ॥ २०१ ॥

मंदाक्रांता.

मोतीयाचे रुचिर गजरे घालिती वेणिमाजी ।
रामा अंगा मलयज[1]-रसा लाविती कर्पुरा जी ।
उष्णें म्लानप्रकृति नर ते प्राशुनी सुंदरींचा ।
होती ताजे, अधर, जणुं तो घोट कीं हो सुधेचा[2]!॥२०२॥

## दोला-लीला.

साकी.

लोल[3]दृष्टि ह्या ऋतूंत बाला करिती दोला[4]लीला ।
सुंदरगळ्ला केशीं माला गाती घेती झोला[5] ॥ २०३ ॥

हरिणी.

बसुन वरती, झोला[6], तोला करून पुढें वधू, ।
फिरुन सुमुखी वेगें मागें, दिसे मुख कीं विधू ।
पळपळ अशा रीतीं घेती स्तनांशुक हालतें ।
बघुन सुदती होती चित्तीं कृतार्थ कितीक ते !॥२०४॥

दिंडी.

शुभ्र पातळ रमणीय खुले अंगीं ।
कंचुकीवर कशिदा हि बुट्या रंगी ।
पदरभूषा हालती कंठहार ।
नूपुरांचा चरणांत झणत्कार ! ॥ २०५ ॥

प्रहर्षिणी.

पायांतें पसरुनि सुंदरी सुगानें ।
गाती त्या मद[8]भरिता पिक[9]स्वरानें ।

---

१ चंदन. २ अमृताचा. ३ चंचल. ४ झोपाळ्यावर झोंके घेणें. ५ झोंका. ६ याचा संबंध घेती याकडे. ७ मासोळ्या. ८ तारुण्यभरयुक्त. ९ कोकिल.

पादाग्रा प्रति-पळ फार नेट देती ।
झोक्यांतें बहु सुमुखी सहर्ष घेती ! ॥२०६॥

साक्या.

ताठा घेती स्फुटकुचयुगुला नमती फिरून पाहीं ।
झोके गाणीं यांजपुढें मग न सुचे दुसरें कांहीं॥२०७॥
ग्रीष्मीं श्रेष्ठीं ज्येष्ठीं दशहर मनुज श्रीगंगेचा ।
उत्सव करिती तदंशभूता गोदाकृष्णादींचा ॥ २०८ ॥
दशदिन गंगोत्सव नर करिती हर्षानें तो थाटीं ।
नदी-तटाकीं रमणीया ते दिसते शोभा मोठी ॥ २०९ ॥

दिंडी.

दिसे मंडप विस्तीर्ण रम्यघाटीं ।
बहुत हंड्या आरास तेथ मोठी ।
कुठें मखरें करिताति फार हौसें ।
चढाओढीं खर्चिती फार पैसे ॥ २१० ॥

साकी.

गंगाप्रतिमा सुरेख मखरीं शोभित दिसते सौम्य ।
ठायींठायीं वस्त्रभूषणें चमकत असती रम्य॥ २११ ॥

आर्या.

भोजनथाटा पाटां मांडुनि जन लवकरी च करिताती।
पक्वान्नांची गरदी स्वकीय-नाम-प्रसिद्धिकरितां ती २१२॥

दिंडी.

दीपपंक्तींचा थाट कथा रात्रीं ।
हर्षदात्री कौमुदी नदी-पात्रीं ।
थंड झुळुका येऊन सौख्य देती ।
देइ चित्ता आनंद सुशोभा ती ॥ २१३ ॥

साकी.

ज्येष्ठ-पौर्णिमा-दिवशीं वस्त्रें करूनि कार्पासाचीं ।
पूजासाहित्यांतें सुदती घेती तबकीं साची ॥ २१४ ॥

दिंडी.

पैठण्या त्या नेसती नवे दंड्ये ।
कंचुकींवर खुलताति लाल गोंडे ॥
सुंदरांगीं शोभती बहुत भूषा ।
अशा थाटें जाताति रम्यवेषा ॥ २१५ ॥

साकी.

सावित्रीतें पूजित बसती वटवृक्षाच्या पारीं ।
एकीमेकी हळदीकुंका देती वाणें नारी ॥ २१६ ॥

---

## वर्षाऋतु.

आर्या.

वर्षाऋतु हा आला अंबुदसैनिक समागमें थाट ।
ग्रीष्माहित हननाला शरवर्षावें करून कीं दाट ॥२१७॥
अस्थिर अनेकरागी गुणेरहित असून वक्र तें अणिक ।
इंद्रशरासन तेव्हां शोभे असती-मनापरी क्षणिक २१८॥
गुणवत्संगें होती, निर्गुण गुणवान् असें असे महित ।
सगुणाश्रासह राहुनि, कुटिला चापा कसा गुणें रहित !
वाहे सोसाट्यानें चालू असतां समीर आसारें ।
कंपित शीतजलानें होउन जाई त्वरें च हें सारें !॥२२०॥
प्रावृट्-शीतलवातें होई संत्रस्त अभ्र त्या काळीं ।

---

१ मेघ. २ शत्रु. ३ जल, बाण. ४ प्रीति, रंग. ५ सद्गुण, दोरी. ६ जारिणी. ७ शब्दगुणयुक्त ( शब्दगुणक आकाश ). ८ वारा. ९ वृष्टि. १० तत्त्व. ११ वर्षाऋतु.

तद्वारणार्थ घेतें अंगीं कीं मेघकंबलों काळी ! ॥२२१॥
जीवनदात्या चपला त्यजुनी जाई क्षणांत अन्यत्र ।
अस्थिरवृत्ति प्रमदा क्वचित चि रमताति नित्य एकत्र ॥
सुकालिं हर्ष च होतो, बघतां क्षणिं धूलिधूसरा जलदा ।
पुत्रापरि मलिनांबरें करुनी गर्जूनि खेळतात तदा२२३

इंद्रवज्रा.

आकाश उन्मत्त करी तयावरी ।
आरूढ होई घनराज सत्वरी ।
घेऊनि संगें बहु कृष्ण सैनिक ।
मारी ह्मणी तापद शत्रु घातुक ॥ २२४ ॥

उपजाति.

नदी-तडागादि जला हरूनि ।
शुष्का धरा वृक्षलता करूनि ।
उष्णांशु कोठें लपला पहाती ।
विजा-दिवे घेउनि मेघ हातीं ! ॥ २२५ ॥

दिंडी.

मेघ-बंदुकरांगेस वीजतोडे ।
पेटवी ऋतु तत्काल ते धडाडे ।
तीक्ष्ण गारा गोळ्या च सोडुनी कीं ।
ग्रीष्म-शत्रुस मारितो मत्त लोकीं ॥ २२६ ॥

वसंततिलका.

विद्युदृशा बघुनि ताप अहो जनांचा ।
होई दयार्द्र घनराज उदार साचा ।

---

१ शीतलवातनिवारणार्थ. २ कांबळा. ३ उदक. ४ स्त्रिया. ५ धुळीसारखे मळकट, धुळींत खेळल्यामुळें मळकट. ६ वस्त्र, आकाश. ७ विद्युल्लतारूप दृष्टीनें.

ज्या थोर अल्प हि समान चि सर्व होत ।
वृष्टी करूनि जनताप हरी क्षणांत ! ॥ २२७॥

शार्दूलविक्रीडित.

स्वार्थाच्याचिकडे सदा हि गढलें आहे जयांचें मन ।
ऐसे फार, परोपकार करण्या उद्युक्त थोडे जन ।
भक्षी वाडव[1] नित्य पोट भरण्या अंभोनिधीतें[2] पहा ।
सिंधूचें जल घेउनी घन करी वृष्टी हरी ताप हा॥२२८॥

दिंडी.

द्रव्य घेतां स्वार्थार्थ[3] कालिमा ते ।
मुखा येते, नाश्चर्य यांत होतें ।
परार्थी[4] ही सामुद्र मेघ तोयें[5] ।
घेउनी, ते होतात कृष्णकाय ॥ २२९ ॥

स्रग्धरा.

अभ्राची पोतडी हा करुनि ऋतु जणूं गारुडी खेळ लोकां-
दावी, सर्वां कळाया हित[6]रत दिसण्या वाजवी व्योमिं[7] ढक्का[8]
मेघांतें वायु-सूत्रीं पळवि घडिघडी रंग दावूनि मोही ।
दावी सूर्येंदु-दीपां लपवि हि चपलानर्तकी नाचवी ही ॥

उपजाति.

सूं सूं सुटे वायु मधूनि फार ।
भरूनि येई बहु दाट अभ्र ।
सरीवरी येति महा सरी ही ।
अंधारुनी येई दिसे न कांहीं ॥ २३१ ॥

---

१ समुद्रांतील अग्नि. २ समुद्र. ३ आपल्या कार्याकरितां. ४ दुसऱ्याकरितां. ५ उदक. ६ वर्षाऋतु परहिताविषयीं तत्पर, गारुडी स्वहिताविषयीं. ७ आकाशीं. ८ ढोलकें.

शिखरिणी.

मृदंग-ध्वानांतें जलद करिती, त्यांस बघुनी ।
स्रक्[1]-पौष्पा[2]-वेणी-सम रुचि[3] कलापां[4] पसरुनी ॥
सुनृत्यांतें केकी[5] करित असती; हें बघुन ती ।
सरोमांचा[6] होते नवतृण-मिषें कीं वसुमती[7] ! ॥ २३२ ॥

मालिनी.

घन करुनि निनादा वारि-वृष्टी करीती ।
सकल वसुमती ती आर्द्र अत्यंत होती ।
वनगिरिंवर धो धो अंबु चाले सुवेगें ।
अलघु[8] लघु[9] नद्या ही पूर्ण होती जलौघें ॥ २३३ ॥

साकी.

शैलाग्राच्या वरुनि उड्या हे टाकित असति जलौघ ।
उष्णारीच्या पाठीं लागत धांवति जणुं हे मेघ॥२३४॥

वसंततिलका.

नामापरी कृति असे विरला यथार्था ।
आहे क्षमाधरिं[10] परी अचलीं[11] च सार्था ।
ज्यांच्यावरी जरि कितीक हि वृष्टि राही ।
अत्यल्प ही तरि न हे ढळतात पाहीं ॥२३५॥
पूरीं नद्या सकल पूर्ण भरूनि जाती ।
त्यांच्यांत वृक्ष किति जंतु हि वाहताती ।
पेटीं न चालति अगाध[12]जलांत नौका ।
पांथस्थ बैसति तटस्थ[13] तटस्थ[14] देखा ॥ २३६ ॥

---

१ स्त्री. २ पुष्पांनीं गुंफित. ३ शोभा. ४ पिसारा. ५ मोर. ६ नृत्य पाहून पृथ्वीच्या अंगावर रोमांच येतात. ७ पृथ्वी. ८ मोठ्या. ९ लहान. १० क्षमा=शांति ( पक्षीं ) पृथ्वी धारण करणारे पर्वत. अचल नढळणारे. ११ हा शब्द जरी अशुद्ध आहे तरी प्रचारांत फार आहे. १२ फार. १३ तीरावर बसणारे. १४ स्वस्थ.

उपेंद्रवज्रा.

तरंगिणी[1] गे, जडसंगतीनें ।
चराचरा नाशुन तूं मदानें[2] ।
स्वकूलें[3] ही भ्रष्ट[4] करून जाशी ।
ह्मणून पंकाविल[5] सत्य होशी ! ॥ २३७ ॥

दिंडी.

पडति धारा वांकड्या किति समोर ।
असंख्यावधि उडतात जलतुषार ।
सधनगेहें गळताति तीं हि थोर ।
तदन्यांचा कोठून हो गुजार ॥ २३८ ॥

साक्या.

अतर्क्य लीला जगदीशाची होतां वर्षण भासे ।
कोठुनि जल हें इतकें येतें, जातें कोठें कैसें ॥२३९॥
क्षारसमुद्रोदक घेउनि घन करिती मधुर तयातें ।
चतुरजनाच्या हातें कैशि हि गोड च कृति ते होते२४०
एकसारखी चालू राही मोठी अखंडधार ।
जिकडे तिकडे पाणि च पाणी ओलें हो घरदार॥२४१॥
ओढे विहिरी तलाव यांना पाणी अपरंपार ।
रस्ते वाटा यांवरती ही चालति मोठे पूर ॥ २४२ ॥
डरांव् डरांव् ते बेडुक करिती मोठ्यानें पाण्यांत ।
टो टो करित चि सर्प हि निघती शिरतां पाणि बिळांत॥
सिंह व्याघ्र हि मेघ गर्जना ऐकुनि विनिद्र होती ।
पुच्छें अपटुनि डुरकया फोडित बघती शत्रु सभोंती२४४
स्त्रिया मुलांना मृगी पाडसां गाई वत्सां पोटीं ।

---

१ नदी. ( स्त्री ). २ उन्मत्तपणानें. ३ वंश, तट. ४ दूषित, पाडलेलें. ५ पाप, चिखल.

धरुनि बैसति घट्ट; गर्जना होतां प्रचंड मोठी ॥२४९॥
कडकड कडकड वीज कडकडे मध्यें एकाएकीं।
ऐकुनि चकित चि सकल हि होती पडेल कीं या धाकीं॥

आर्या.

धाराशस्त्रें घनराट् ग्रीष्मर्तुदवानलारि नाशुनियां।
विद्युन्नयनीं पाहुनि, गर्जे विजयी अयुक्त हें न तया।

शार्दूलविक्रीडित.

मेघा, तूं पडुनी चराचर जगा आनंदवीशी खरें।
विद्युत्स्त्री तुझि चंचला चि पडतां होई चुराडा अरे !।
पाहूनी भुलतोस गोमटि वधू बैसे तुझ्या ती शिरीं।
नाचे ज्यापरि नाचुं देशि तिजला हे रीत नोहे बरी !॥
निर्व्यापार असे समग्र जन ही स्वीया-लयीं बैसती।
जाण्या कोणी धजे न अन्यसदना होई अशी हो स्थिती
गाई व्याघ्र पशू बकादि नयनां झांकूनि पक्षी किती।
ध्यानस्था मुनिच्यापरी किति बकध्यानी हि ते राहती॥

साक्या.

चिखलावरुनी किति जन जातां जातां ते पडताति।
नसेल कोणी पाहीलें ना? चहूंकडे बघताति ॥२५०॥
शेतकरी ते धान्यें घेउनि उत्सुक शेतीं जाती।
पेरुनि त्यांतें अभिमतवर्षण व्हावेंसें इच्छीती ॥२५१॥

मालिनी.

नवनवजलयोगें अंकुरोद्भेद होई।
तृणदलनिकरानें रम्य हो रानराई।
सकल तरु-लतांनां वृष्टिनें येई तेज।
नर पशु खग यांच्या दृष्टिला होई चोज ॥२५२॥

फुटुनि तृण सुमार्गी झांकि तेव्हां च दाट।
झडकरि उमगेना जावया गांविं वाट।
बहुत दिवस जातां जेविं अज्ञान-योगें।
स्फुरति समयिं विद्या पंडितांही न वेगें! ॥२५३॥

वसंततिलका.

पृथ्वी तृणें हिरवि गार वरी किडे हे।
सोनेरि लाल पिवळे हि रुपेरि पाहें।
हें चित्र-वस्त्र करुनी ऋतुनें प्रियेला।
नेसावयास दिधलें गमतें मनाला! ॥ २५४ ॥

संतापदायि अधिकार तपर्तुचा तो।
जातां अतां सकल शांत च लोक होतो।
वर्षर्तु राज्यि कवणास हि ताप नाहीं।
साजे खला सुपुरुषा उपमा बरी ही ॥ २५५ ॥

दिंड्या.

क्रमें तिसऱ्या वर्षीं[1] च ऋतुमती हो।
हरितें[2] लुगडें नेसते वसुमती[3] हो!।
करुनि मंडप वाजवी वाद्य-संघें[4]।
स्वसंगानें अंकुरां करी मेघ! ॥ २५६ ॥

नृत्य गणिका[5] पुष्पिता करिति देख।
भ्रमर-वाद्य च जणुं वाजवी सुरेख।
पारिजातां अनुराग[6] हर्ष होतो!।
वक्र गुलछबु पाहून हांसतो तो! ॥ २५७ ॥

---

१ वर्ष, वर्षाऋतु. २ हिरवें. ३ पृथ्वी. ४ समुदाय. ५ जुई. ६ प्रेम, अनु=मागें राग=लाली ( पारिजाताचे फुलाचा देंठ लाल असतोच ).

लता-वृक्षीं टवटवी खुले फार ।
दलांवर सित[1] पडताति बिंदु गार ।
जीवनानें[2] आनंद पावताति ।
लता ऋतुवर मौक्तिकें ओतिताति ॥ २५८ ॥

आर्या.

स्वकरीं खुरपीं घेउनि, शेतकरी करिति काम शेतांत ।
काढिति तृणझाडांतें, स्त्रिया हि तत्पति[3] मुलें हि तत्तात[4] ॥
खंडांशुकयुत[5] कर्षक[6], कांपत करितात काम ते रानीं ।
जडसंगें[7] मलिनघना[8], पीडिसि दीनां अखंड[9] धारांनीं ॥
करुं दे कामें त्यांना, सोडुं नको कांहिं काळ फार जला ।
मेघा, जीवनदाता[10], मानिति जरि पीडिशी च ते तुजला ॥

शार्दूलविक्रीडित.

गंभीरध्वनि अंबुदालि[11] करती विद्युल्लता चालती ।
वाहे शीत समीर सोदक तदा भृंगालि ही गुंजती ।
चंद्राकारिक[12] चंद्रकां[13] पसरुनी बर्हीं[14] कसे नाचती ।
ह्या कालीं अबला त्यजून निघती पांथ श्रमा पावती २६२

दिंडी.

"बालहरणी-चललोचना सुनेत्री ।
स्तनित[15] ऐकुनि धांवूनि ये सुगात्री ।
दृढालिंगुन मज भीरु शांत नोहे" ।
पांथ बोले 'मजवीण कशी राहे' ॥ २६३ ॥

---

१ पांढरे २ जीवदान, जल. ३ स्त्रियांचे पति. ४ मुलांचे बाप. ५ लहान वस्त्र. ६ शेतकरी. ७ मूर्ख, जल. ८ पापी, मळकट. ९ सतत. १० जीवदान देणारा, उदक देणारा. ११ मेघपंक्ती. १२ चंद्रासारखा आहे आकार ज्यांचा. १३ पिच्छावरचे डोळे. १४ मोर. १५ मेघगर्जना.

साक्या.

प्रियविरहानें सती[1] हि दुःखित होउनि करिते शोक ।
इष्टजनाच्या वियोगकालीं, नाहीं होत विवेक ॥२६४॥
"सुगंधि शीतल मारुत, अंबुद, गर्जत वरतीं येती ।
मयूर नाचत येती मेले! दुःखद मजला होती ॥२६५॥
अग पण बाई! तूं स्त्री असुनी, चपले[2], हससी कैशी!"
वियोगिनी[3] हें बोलुनि पडते रंभा वातें जैशी॥२६६॥
सुगंधि शीतल वायु येउनी सावध करितो तीशी ।
उठुनी प्रियकरशोधाकरितां, जाई ती आवेशीं ॥२६७॥
खिन्ना रुष्टा रमणी बोले, मेघा! मज दीनास ।
नाडावें या हेतूनें त्वां, केले किती प्रयास ॥ २६८ ॥
पंकिल भू ही, जलधारांनीं गगन, दिशा चपलांनीं ।
व्याप्त नद्या ही पूरीं, तैशीं विपिनें वृक्षलतांनीं ॥२६९॥
प्रियकर-शोधा मी निघतां रे तुजला असह्य झालें ।
अबलाघाताकरितां मेल्या! मलिना! हें त्वां केलें २७०
इतकें करुनी गर्जसि वरतीं, काळ्या! लाज च नाहीं!
ऐसें रमणी बोलुन शोकें मूर्छित फिरून राही ॥२७१॥

स्रग्धरा.

झांकूनी चंद्र-तेजा घन निज-महिमा दाविण्यासाठीं जाय
होई सारें परी तें उलट मलिनिमा व्यक्त त्याचा च होय
जे कां विद्वज्जनांचे मलिन जन गुणां झांकुनि स्वीय बुद्धी।
दावाया जाति, त्यांचे अवगुण दिसती स्पष्ट सर्वांस आधीं

आर्या.

ह्या वर्षाऋतुमाजी, स्वकीय वैभव[4] जनांस तम[5] दावी ।

---

१ पतिव्रता. २ वीज. ३ विरहिणी. ४ ऐश्वर्य ( फार काळेपणा).
५ अंधार.

अंबुदसमागमानें, शोभा त्याची किती मग वदावी२७३
मेघावरणें रात्रीं, दर्शन[1]मार्गास आड येति तमें ।
मलिनाच्या संगानें, दर्शन[2]मार्गास आड जेंवि [3]तमें२७४
लिंपी तम सर्वजगा, अंजन[4]वृष्टी च अभ्र कीं करितें ।
विफल[5] सुदृष्टि होते, सेवा [6]असदालयीं कृतापरि तें ॥
सकला[7]भेतें नाशी अज्ञान प्रोच्च नीच हो स्थानीं ।
व्यर्थ चि विचार होती, होतां दुर्जन तमि[8]स्र ही स्था[9]नीं ॥

साक्या.

कस्तूरीच्या दाट रसानें, कज्जलपंकानें कीं ।
वि[10]षकंठाच्या कंठाभेनें, व्याप्त च विश्व विलोकीं ॥२७७
कालिंदी[11]जल-कस्तूरी-करि[12]घटे[13]शगलनीलाब्ज ।
वर्षारात्रितमाचें बालक, दिसतो बरवा साज !॥२७८॥

दिंडी.

काकवर्णासारिखा अंधकार ।
त्यास अंबुदजडमलिनसंग थोर ।
"अधीं मर्कट" इत्यादि तसें झालें ।
अंधकारें सर्वांस अंध केलें ! ॥ २७९ ॥

इंद्रवज्रा.

गाढांधकारीं फिरताति चोर ।
स्थानांस सांकेति[14]कें जाति जार ।
वंचून भर्त्या [15]असतीच जाती ! ।
चित्तीं न त्या आणिति [16]वर्ण जाती ॥ २८० ॥

---

१ दृष्टि. २ शास्त्र. ३ अज्ञानें. ४ काजळ. ५ निष्फळ. ६ दुर्जन. ७ शोभा. ८ अंधकार. ९ अधिकारावर. १० शिव. ११ यमुना. १२ हत्तींचा समुदाय. १३ शिवाचा गळा. १४ संकेत केलेल्या. १५ जारिणी. १६ ब्राह्मणादि.

वसंततिलका.

"जातेस तूं घनतमांत कुठें मृगाक्षी" ? ।
"मत्प्राण जो रमण तत्सदनास लक्षीं ।"
"नाहीं कसें भय तुला"? पुसतां च कोणी ।
बोले सवें मदन सज्ज-धनुष्य-पाणी ॥ २८१ ॥

शिखरिणी.

"सवें सज्जाऽनंगा[1]नुचर असतो, तूं विधुमुखी ।
जडावाची भूषा चमकतअसे ते लखलखी ।
रण[2]न्मंजीरें तीं जणुं हृद[3]यभू-दुंदुभि झडे ।
अशा थाटें जातां चकित बघशी कां चहुंकडे ?" २८२

मालिनी.

"जनपशुतिमिरांची भीति नाहीं च मातें ।
पर, कुसुमधनूनें म[4]दृगंतेषु-घातें ।
व्यथित कितिक केले पामरा, त्वत्समान ।
बघतबघत जातें त्यांस रे हें च मान" ॥ २८३ ॥

आर्या.

जातां विलासिनीतें, लागे पर्जन्य तो मुसळधार ।
पंकि[5]लभूवर पडतां, जाते धरण्यास धार आधार !॥

साक्या.

श्रावणशुक्लीं नागपंचमी, येई सण दिवशीं ह्या ।
नागा काढुनि पूजा करिती, ल[6]लना वाहुनि लाह्या२८५
कोठें वल्मीकांतें जाउनि, सहर्ष करिती पूजा ।
एकीमेकी हळदी कुंकू देती तेथें लाँ[7]जा ॥ २८६ ॥

---

१ मदन हाच शिपाई. २ वाजणाऱ्या मासोळ्या. ३ मदनाचा चौघडा. ४ माझ्या कटाक्षबाणाच्या तडाक्यानें. ५ निसरडी. ६ स्त्रिया. ७ लाह्या.

दिंडी.

नवीं लुगडीं शोभती नव्या चोळ्या ।
भूषितांगा थोड्याच त्यांत भोळ्या ।
तुर्ययामीं सुंदरी डामडौलें ।
जमुन फेरे घेतात, लोक डोले ॥ २८७ ॥

साकी.

एकीमेकी हात धरूनी, वर्तुल फेरे घेती ।
सिंहकटी त्या सत्वर लवुनी, सुंदर गाणीं गाती॥२८८॥

मालिनी.

झुणुझुणु पदभूषाशब्द कानांत दाटे ।
चलवसन फिरे तें डोलतें काय वाटे ! ।
बघुनि रुचिर लीला रम्यनेत्रादिकांची ।
कितिक पुरुष चित्तीं होति संतुष्ट साची ! ॥२८९॥

आर्या.

घे अ[1]ज नि[2]शीथ होतां श्रावणकृष्णाष्टमीस अवतारा ।
असुरे[3]भाभा[4]हरि हो, र[5]व्युदयीं कुठुन चमकती तारा ॥
वसुदेवाचा सुत हरि, होतो करण्यास सत्य ती अ[6]जगी
तो वासुदेव नामें, असु[6]रांसूतें हरावयास जगीं ॥२९१॥
गोपालगोपिकांच्या, तापातें स्नेहवर्षणें हरि तो ।
मेघ श्यामल ऋतुपरि, धेन्वादिपशूंस तुष्टि करि हरि तो॥
गोकुललीलाव्याजें, वधिले दुर्बुद्धि थोर ते असुर ।
मथुरेंत कंस वधुनी, हरि भूभ[7]र करि सुहृष्ट मर्त्य सुर ॥

शिखरिणी.

अनंता कृष्णाच्या बहुविध कथा राम-सहिता ।
कविव्यासादींनीं कृत-सुकवनीं विश्व-महिता ।

---

१ कृष्ण. २ दोन प्रहर रात्र. ३ दैत्यरूपहत्तींची प्रभा. ४ हरण करणारा सिंह, विष्णु. ५ ब्रह्मदेवाची वाणी. ६ प्राण. ७ भूमीचा भार.

तया श्रीकृष्णाचा मनुज करिती उत्सव महा ! ।
छतें हंड्या झाडें लकलकित दीपावलि अहा ! ॥२९४॥

साक्या.

श्रावणशुक्लप्रतिपत्पासुनि कृष्णोत्सव करिताती ।
पूजा बांधिति थाटें ब्राह्मण-भोजन जन घालीति॥२९५॥
कृष्णजन्मदिनिं भक्तीनें ते करिती उपोषणाला ।
दुसरे दिवशीं करिति पारणा द्विज घेउनि पंक्तीला २९६

दिंडी.

उत्सवाचा दिन आठ थाट राही ।
गीत कीर्तन होतात पुराणें ही ।
जन्मकालीं शोभते मूर्ति फार ।
रामजन्मापरि सर्व थाट थोर ॥ २९७ ॥

भाद्रशुक्लीं गाणेशचतुर्थी ती ।
येइ उत्सुक उत्सवा लोक होती ।
सुबक करिती मृन्मयी गणपमूर्ती ।
उत्सवातें करिताति पूजुनी, ती ॥ २९८ ॥

साख्या.

रंगमहालीं देउनि वर छत झालर झुमरें तैशीं ।
जाळ्या नानापरिच्या खोदुनि करिती मखरें खाशीं२९९
हंड्या नानारंगीं झाडें, तसबिरि अरसे दाट ।
चित्रविचित्रित चित्रें अग्रीं मांडिति, दिसतो थाट३००

वसंततिलका.

दूर्वा फुलें विविध-गंध अनेकरंगी ।
आणूनि पूजिति गजानन अग्रभागीं ।

---

१ भाद्रपद.

धूप प्रदीप अरती करती गणेशा।
पक्वान्न मोदक समर्पिति ते परेशा ॥ ३०१ ॥

वंशस्थेंद्रवंशा.

कथा पुराणें श्रुतिघोष चालती।
श्रीमंतगेहीं हि घरोघरीं किती।
आलाप घेती गवई सुरावरी।
सुनृत्य वेश्या करितात भीतरी ॥ ३०२ ॥

## शरदृतुवर्णन.

शिखरिणी.

[1]सदानंदातें जो सुखभर करी स्वाद्भुतरसें।
कराया [2]रामा जो प्रि[3]यँवि[4]हँतिकर्मी ह्मणतसे।
असे ज्याला प्रेमा कुसुमितवनीं केलिविषयीं।
शरत् श्रीकृष्णाचें चरित ऋतु दावी सुसमयीं ॥ ३०३ ॥
[5]हरिद्वस्त्रा नेसे बहु रुइफुली कांठ सरसे।
अलिश्रेणी वेणी ति[6]लक नि[7]टिलीं शोभत असे।
सुचंद्रातें घाली सुबक हि फुलें केतक दिसे।
सुवर्णालंकारीं शरद[8]मलरं[9]भोरु विलसे ॥ ३०४ ॥

इंद्रवज्रा.

रम्यप्रसन्नें[10]दुमुखी दिसे जे।
शुभ्रां[11]बरानें रमणी विराजे।
हो हं[12]सकीं भूषित पद्मनेत्री।
वाटे शरच्छ्री जणुं ही सुगात्री ॥ ३०५ ॥

---

१ जो सुखभर शरदृतु आपल्या विलक्षण मिष्ट फलादि रसानें सदा आनंदातें करी; जो कृष्ण आपल्या अद्भुत रसानें (शृंगारादिकां पैकीं) नंदाला सुखभर करी. २ स्त्रिया, बलराम. ३ पति, इष्ट. ४ विहार. ५ हिरवें. ६ टिळा, तिळाचें झाड. ७ कपाळ. ८ गोरी. ९ स्त्री. १० चंद्राप्रमाणें (पक्षीं) चंद्रच आहे मुख जीचें. ११ वस्त्र, आकाश. १२ हंस, पादभूषण.

हरिणी.

प्रिय-विधुकर[1]राश्लिष्टा[2] तुष्टा पयोधर[3]शांति ती।
त्वरित घडते, होते शांता कटाक्ष[4]चला-तती।
बहुसुख भरोत्कर्षे तोषे प्रसन्न शरद्वधू।
बहुतदिवशीं येतां भर्ता कितीक सुखें वदूं! ॥ ३०६ ॥

वसंततिलका.

द्यामाजि ऐंद्र धनु न प्रगटे सुरंगी।
नानापरी न घन ही दिसती खं[5]भार्गी।
व्योमीं! कधीं फिरति मेघ रिते सुशुभ्र।
शोभे सदंतरिव निर्मल रम्य अभ्र ॥ ३०७ ॥
आतृप्तिजीवन समग्रचराचराला।
देऊनि ताप हरुनी बहु हर्ष केला।
हे मेघराज अजि निर्वसु[6] जाहलाशी।
शोभा च ही तुज दिसे जगतांत खाशी! ३०८

साक्या.

रुचिकर लागुनि पचनीं पडतें, अन्नोदक ज्यामाजी।
प्राबल्यातें पावुन दिसते, सुंदर तनु ही ताजी ॥३०९॥
नर पशु पक्षी सर्व प्राणी हुशार दिसती ताजे।
प्रफुल्ल वल्ली मल्ली तरुवर सुरेख खुलती तेजें ॥ ३१० ॥
ग्रामवनीं बहु कुसुमित वल्ली सुंदर दिसती दाट।
सौंदर्यानें पूर्ण श्री कीं करून आली थाट ॥ ३११ ॥
पुष्पवाटिका प्रफुल्ल होती, घमघम सुवास येतो।
वरूनि मारुत झुळुझुळु येउनि सुखद तनूला होतो ३१२

---

१ किरण, हस्त. २ आलिंगित. ३ स्तन, मेघ. ४ कटाक्षांची चंचल परंपरा, कटाक्षापरी ज्या चला विजा त्यांची पंक्ति. ५ आकाश. ६ द्रव्यरहित, उदकरहित.

किती प्रफुल्लित विनम्र वल्ली फलिनी[1] कितीक तैशा।
तरुणी सुमुखी स्तनभारानें लज्जित सुतनू जैशा ३१३

शालिनी.

जाई शोभे मंडपीं पुष्पिताग्रा।
शेवंती ही शोभते पुष्पनम्रा।
झेंडू, मर्वा, पाच चांफा गुलाब।
मोतीया ही देतसे गंध लांब ॥ ३१४ ॥

दिंडी.

शुभ्रजाई शेवंति पातळातें।
नेसुनी कीं आली च शरत्स्त्री ते।
झेंडुचे ज्या जरिकांठ गुलाबाचे।
छटे मधिं मधिं मन मोहिते जनांचें॥३१५॥

वसंततिलका.

ह्या झेंडुच्या कितिक पुष्पित रम्य रांगा।
बागांत आणिक घरोघरिं ही सुरंगा।
जाती तयांमधिं अनेक सुरेख गोल।
कीं गालिचे पसरले ऋतुनें अमोल ॥ ३१६ ॥
शोभेंत थोडिंच फुलें तुझिया समान।
आहेत झेंडु,! पृथिवीवरि सत्य मान।
बारे तुझ्यांत असता जरि कां सुवास।
बागें-मधें न मिळता इतरांस वासे[3] ॥ ३१७ ॥

शार्दूलविक्रीडित.

शेवंती गुलनार गुलूछबु गुलाब श्रेष्ठ चित्ता हरी।
झेंडू पद्म कण्हेर मालति लता जास्वंद यांच्यावरी।

---

१ फलयुक्त. २ प्रफुल्लित आहेत शेंडे जोचे. ३ स्थान.

नानारंग सुगंध, आकृति; कृती ज्याची अशी शोभन।
कारागीर असा असे कवण तो पाहा मनीं शोधुन! ३१८

शिखरिणी.

सपुष्पा वेली ह्या तरुस धरुनी स्वेच्छ रमती।
सुकालीं हा युक्त क्रम, पर[1] चमत्कार दिसती।
कुमारी[2] ही पुष्पें सहित असती सांप्रत किती।
रजो-हीना मह्मी मलिन-मधुपासक्त असती! ३१९॥

वसंततिलका.

कैशी प्रफुल्ल दिसते नवकेतकाली।
घेई सुगंध मधुपालि बसून काळी।
हे केवडे न गमती स्मर-कुंत[3] तीक्ष्ण।
मारावया सविष[4] हे विरह्या सकोण[5]॥ ३२०॥

साक्या.

गौर केतकी, दलकरनखरीं[6] पीडुनि मधुव्रतातें[7]
समणिभुजंगा[8] देखुनि देशी त्याप्रति गे संगातें! ॥
मंडप-मखरीं नवीन पुष्पित, असती वेली भृंगा!।
चलदलहस्तीं नाहीं ह्मणतां, मलिना? करिशी संगा! ३२१

शिखरिणी.

पडोळीं घोसाळीं परवर-फळें मंडपतळीं।
तशीं शेंगावांगीं बहुमृदुल बागेंत कवळीं।
किती पेरू केळीं अति-मधुर सीता-फळतती।
लतावृक्षीं नाना फलकुसुमराजी विलसती॥३२२॥

---

१ अन्य. २ मुली, कांटेशेंवती. ३ मदनाचे भाले. ४ विषयुक्त. ५ तीक्ष्णअग्रयुक्त. ६ पर्णरूप हस्तनखांनीं. ७ चांगलें आहे व्रत ज्यांचें, भ्रमर. ८ रत्नयुक्त ( सर्पशिरीं मणी असतो. )

साकी.

जिकडे तिकडे सुंदर शेतें, दिसती हिरवींगार ।
सुलतालिंगित पर्वत तरु ही दिसती सुरेख फार ३२३ ॥

वसंततिलका.

क्षेत्रें[1] अनेक दिसती रमणीय खाशीं ।
लक्ष्मी वनांत रमते परिपूर्ण हौशी ।
हर्षे कृषीवल[2] मधें करितात धंदे ।
पक्षी सहर्ष करिती स्थल पूर्ण नादें ॥ ३२४ ॥

साक्या.

कणसें हळुहळु नवीन निघती, शोभा त्यांची फार ।
कोमल दाणे दिसती सुंदर, सृष्टीचें तें सार ॥३२५॥
कणसांवरतीं नवीन दाणे, ओळीनें ते दाट ।
शरदें लोकां मौक्तिक-कणसें ताटीं अणिली भेट! ३२६
कर्षक[3] माळ्यांवर बैसूनी, कोलाहल करिताति ।
गोफण धोंडे गुंगत हाणुन, पक्ष्यांतें उडवीति ॥३२७॥

मालिनी.

सकल सकल[4] पक्षी रम्यवृक्षीं बसूनी ।
मग फलरसधान्यां भक्षिती थोर रानीं ।
विमलें[5] जल नदीचें प्राशुनी खेळताती ।
उडतउडत हर्षे स्वेच्छें[6] लीला करीती ॥ ३२८ ॥
पशु नविन तृणातें भक्षुनी पुष्ट होती ।
करुन वर सुपुच्छां उच्च शब्दा करीती ।
समदं[7] वृष[8] नदीचें तीर हुंदाडिताती ।
भिडवुनि खर[9] शृंगां मत्त झुंजा करीती ॥ ३२९ ॥

---

१ शेतें. २ शेतकरी. ३ शेतकरी. ४ शब्दसहित. ५ स्वच्छ. ६ स्वच्छंद. ७ उन्मत्त. ८ बैल. ९ तीक्ष्ण.

साक्या.

निर्झर मौक्तिक शुभ्रहार जणुं धरिती अंगिं सुरेख ।
हिरण्या वेषा करुनी सुलता आलिंगिति गिरि देख ३३०
शरन्नद्या त्या पुलिनें हळुहळु दावित असती रम्य ॥
नवीन संगमलज्जित बाला स्वांग जसें पतिकाम्य ३३१

दिंडी.

नदीपात्रीं रमणीयता विशेष ।
स्वच्छ उदकें देतात मनां तोष ।
प्रसन्ना ह्या चालती नद्या वाटे ।
खरेनें कीं प्रियसंगमेच्छु वाटे ॥ ३३२ ॥

उपजाति.

सुज्ञाचिया संगतिनें विशुद्ध ।
होतीं खलांचीं कुमनें; प्रसिद्ध ।
ऋतूचिया या सुसमागमें हीं ।
तैशीं जलें निर्मल शांत पाहीं ॥ ३३३ ॥

शिखरिणी.

तुला सत्पात्राची[1] सतत असते संगति बरी ।
तसे दोन्ही भागीं प्रबल[2] असती रोध[3] हि तरी ।
जला, चांचल्यातें धरुन असशी नीचँग[4] खरें ।
स्वभंगा[5] पावूनी फिरत असशी संभ्रम[6]-भरें ॥ ३३४ ॥

साकी.

जलाशयीं[7] ह्या ऋतूंत कमलें प्रफुल्ल होती फार ।
मधुकर गुंजारव वर करिती शोभा दिसते थोर॥३३५॥

---

१ योग्याची, प्रवाहाची रुंदी. २ बळकट. ३ प्रतिबंध, तट. ४ हलकटासहगमन करणारें, सखल स्थळाकडे जाणारें. ५ आपला मोड, तरंग. ६ घाबरेपणा, भोंरे. ७ तळें.

दिंड्या.

जलामध्यें[1] सर्वदा असे स्थान ।
मधुपवृंदा सप्रेम देइ मान ।
कंटकांशीं[2] आजन्म सख्य आहे ।
मुदित मित्रोदयिं पद्म तरी राहे ॥ ३३६ ॥
करी जागृत सन्मित्र[3] करीं[4] लोकां ।
येइ तुज ही करण्यास पाहुनी कां ? ।
मिटिसि डोळे[5] तरि तूं हि कुमुदिनी[6] गे ।
कशी वाटत तुज लाज नसे सांगें ॥ ३३७ ॥

उपजाति.

रत्नाकरांचा[7] सुत शांत कांत ।
श्रीचा[8] असे बंधु कलांनियुक्त[9] ।
सुधा[10]करांनीं[11] सुखवी अनेकां ।
अशासवें पद्मिनि रुष्ट तूं कां ! ॥ ३३८ ॥

साकी.

अरविंदावर मिलिंद[12] दाटी करून किति बसती ते ।
पंचशरें[13] हे विषयुत शर चि स्थापित पांथ-वधातें ॥ ३३९ ॥

दिंडी.

तुझ्याठायीं पद्मिनी गुण[14] अनेक ।
परी त्यांचें प्राकट्य[15] नसे स्तोक[16] ।

---

१ जड. २ निर्दय, कांटे. ३ साधूंचा मित्र किंवा उत्तम मित्र ( सूर्य ). ४ किरण, हात. ५ कमलरूप डोळे. ६ चंद्रविकासी कमलिनी. ७ समुद्र, राजा. ८ लक्ष्मी. ९ ६४,१६. १० अमृत. ११ किरण, हात. १२ भ्रमर. १३ मदन. १४ सौंदर्यादि, कमलतंतु. १५ प्रगटपणा. १६ अल्प.

हा च हेतु[1] श्रीयुक्त[2]-रम्य-कोशें[3] ।
मधुप[4]संघा पाळिसी सदा तोषें ॥ ३४० ॥
करस्पर्शें[5] मातंग[6] पद्मिनीस[7] ।
भ्रष्ट[8] करिती पाहून तें अलीस ।
राग येई स्वप्रिया[9]-घर्षणानें ।
फोडण्या तच्छिर[10] जाति जणूं मानें ॥ ३४१ ॥

साकी

कर्णीं ताडित मधुप हि सध्वनि फिरून गंडीं जाती ।
द्विज[11] दाना[12]र्थी तीक्ष्ण ताडनाप्रति नाहीं मानीती ॥ ३४२ ॥

शालिनी.

कंजांदोलीं[13] बैसुनी हंसहंसी ।
झोला घेती वायु येण्या विलासी ।
अंगीं घेती अष्ट-गंधी पराग ।
भृंगी-गीतें डोलती कीं सुराग ॥ ३४३ ॥

आर्या.

रवि ह्या ऋतूंत तापद, करितो प्राण्यांस फार तो कष्टी ।
माध्यान्हीं उष्णानें, होती संपूर्ण कृष्ण मृग पृष्ठीं ॥ ३४४ ॥
धरितां चि दक्षिणाशा[14], तेजस्वि-प्रख्य[15] ही जरी द्युमणी[16] ॥
अपणा केवल नाहीं, स्वाश्रित दिवसां लघुत्व[17] ही आणी

---

१ कारण. २ संपत्ति, शोभा. ३ जामदारखाना, कळे. ४ मद्यपी, भ्रमर. ५. हात, सोंड. ६ चांडाळ, हत्ती. ७ उत्तम स्त्री, कमलिनी. ८ दूषित, उपटणें. ९ आपली प्रिया (पद्मिनी) तिजशीं घर्षण=दांडगाईनें. १० हत्तीचें शिर. ११ ब्राह्मण, भ्रमर. १२ प्रतिग्रह, मदोदक. १३ कमलरूप झोपाळ्यावर. १४ दक्षिणेची इच्छा दक्षिण दिशा. १५ मुख्य. १६ सूर्य. १७ हलकेपणा.

दिंडी.

शुष्कपंका निर्धूलि भूमि शोभे ।
लता-पुष्पीं गुंजती भ्रमर लोभें ।
मंद शीतल सद्गंध वात येतो ।
पांथ-जनता[१]-चित्तांस मोहितो तो ॥ ३४६ ॥

शिखरिणी.

शरत्कालीं शस्त्रें स्मरविधु सुहृत् घे निजकरीं ।
सुगंधी पुष्पांचें नव धनु तदा चित्रित धरी ।
प्रगुंजन्मत्तालिध्वनि च जणुं मौर्वी[२]-रव करी ।
सुदृक्[३]-दृक्-बाणांतें हणुनि विरहि-प्राणच हरी! ॥३४७॥

वसंततिलका.

पुष्पें प्रफुल्ल धनु मन्मथ[४] भृंग मौर्वी ।
सुभ्रूदृगंत[५] शर काम तयास लावी ।
यन्मित्र चंद्र जडमूर्ति[६] जरी अनंग[७] ।
जिंकी जगा, न महतां क्षम[८] काय सांग ॥ ३४८ ॥

दिंडी.

सौख्यकंद च तो होय शारदेंदु ।
कुमुदकुंदीं चंद्रिका विशद बिंदु ।
मोद देती, चालतो मंद मंद ।
वात, घेउन मकरंद रम्य गंध ॥ ३४९ ॥

(दसरा) आर्या.

आश्विन शुक्लप्रतिपत्पासुनि नवरात्र देविचें बसतें ।
जलघटिं देवी मांडुनि, प्रतिदिनिं सुममाळ लाविती जन ते
सप्तशतीच्या पाठा, करिती दीपप्रकाश दिनरात्र ।

---

१ जनसमुदाय. २ दोरी. ३ स्त्रिया. ४ मदन. ५ कटाक्ष. ६ जड, जल. ७ अंगरहित ८ शक्य.

हळदीकुंकुं सुवासिनि, एकीमेकीस देति सर्वत्र॥३५१॥
यापरि नव दिन झटती, नवरात्राच्या सपुत्र जन कामीं।
आली विजया-दशमी स्त्रीसह होती सहर्षमग कामीं३५२

कटाव.

सोन्याचा दिन तो आला, ह्मणती दसरा ज्याला ॥ ध्रु०॥ प्रात:कालीं स्नानापूर्वी, करिती तैलें अभ्यंगातें, केशरिगंधा लावुन भालीं, उटीस घेती सर्वांगातें, सुगंधि गंधें पुष्पादींनीं, पूजितबसती श्रीरंगातें, पोथ्या पाटीं मांडुनि शस्त्रें, पूजिति त्यांच्या मग रांगेतें. सुतमित्रांसह सुभोजनातें, करूनि टाकिति मुखरंगातें, इच्छित भूषण करुनि स्त्रीला देती वांछुन तत्संगातें, हर्षित बाला विडे प्रियाला-देती झांकुन कुच अंगांतें, वाटतें सार्थक तेंव्हां मनमोहक रमणी-लीला॥ सोन्याचा०॥ध्रु०॥धोत्रें रेशिमकांठि नेसती, कितीक सुंदर मंदिल बांधिति, किती कलावर पगडी फिरविति, त्यामधिं शेतें पिंवळीं खोंविति, अंगरखे-कडकडित घालिति, विडी मुखामधिं, छडीहतामधिं, घडी रुमाली, कडकडि पोशाकाची वाजत, जाती घोडीं खडीं जेथ तीं, रौप्यफुलांच्या माला ज्यांला, शिरा हिरा ही तुरा विराजे, खोगिर गजनी वरती राजे, बसती त्यावर जैसे राजे, बाजंत्र्यांचे वाजति बाजे, प्रतिध्वनीनें दिगंत गाजे, जाती जेथें असतें ताजें, अपट्याचें अणि झाड शमीचें, दु:खशमीचें पूजन करुनी, सुवर्णवल्ली स्वीकारूनी, पुष्कळ पैसा खर्चिति दानीं ॥ थाटानें जाती ऐशा दिवशीं त्या शिलंगणाला ॥ सोन्याचादिन० ॥ ध्रु० ॥ निघती तेथुन टाकुन झाडें, ऐटीनें ते अखडिति तोंडें, डौलानें वर करिती चौडे,

वाजत तोंडे चालति घोडे, खडेभुई ती गेल्यावरती बडे लोक मग जोडे ह्मणती, दौडे घोडे-कळप हि तेव्हां, पुढें जावया करिती हेवा, पडे लोक तो वरून तेव्हां, कितीक होती लंगडे मुंडे, खडे लागतां हडें ठणकती, रडें निघे तें, झांकिति तोंडें, ह्मणतिल वेडे, लोक ह्मणूनी, बघती इकडेतिकडे तंव तों, कडेस त्यांच्या सडे लोक ते, विडे खात ते, छडे हातामधिं, फडकित जोडे हांसत येती, कोणी मागुन तट्टूवरती, बसून येती खट्टू होती, नंतर सर्व हि देवा जाती, नमन करूनी सोनें अर्पिति, भेटे कोणी त्यांला देती, आप्तसख्यांतें प्रेमें भेटति, सोनें झाडा काय लागलें, यारीतीं जन खोंचुन बोले, पण तें सत्यचि आजि जाहलें, ओंवाळीती कुरंगनयना, सोनें लगडा देती त्यांना सहर्ष नंतर करुन विनोदा, उपहारादिक करिती धंदा, मग ते उतावळीनें सेविति रात्रिसुखाला ॥ सोन्याचा दिन तो आला० ॥ ३९३ ॥

साक्या.

अश्विन-कार्तिक-मध्यें उत्तम दीपावलि सण येतो ।
स-स्त्री-बालक उपभोगोत्सुक, जन तो हर्षित होतो ॥
सुगंधितैलादींनीं अबला, न्हाती त्रयोदशीस ।
पुरुष पहाटीं पाटीं बैसुन, न्हाती चतुर्दशीस ॥३९५॥

दिंडी.

मध्यभागीं मांडिला पाट राहे ।
भोंवतालीं रांगुळी शोभताहे ।
बसुन त्यावर अत्तरीं अर्गजांहीं ।
स्वांगमर्दन करवुनी न्हाति पाहीं ॥ ३९६ ॥

साक्या.

मग ते स्नाना बसूनि पाटीं, बहूष्ण घेती पाणी
धन्यनराच्या अंगीं फिरती, मृद्वंगीमृदुपाणी ॥ ३५७॥
अंगा पुसुनी नव पीतांबर, नेसुन बसती पाटीं ।
केशर-गंधा लावुन भालीं, अंगीं घेती ऊटी ॥३५८ ॥
नंतर लवकर नित्य विधींतें, अटपुन रेशिम-कांठी ।
नवीन सुंदर धोतरजोडे, नेसतबसती ऐटीं ॥ ३५९ ॥

दिंडी.

पुढें रमणी वाढिती फराळातें ।
अनार्शांतें लाडूंस करंज्यांतें ।
चिरोट्यांतें पोह्यांस कोडबोळीं ।
पुरुष हर्षें भक्षिती रम्यकाळीं ॥ ३६० ॥

साकी.

फराळ करुनी द्यूतक्रीडा, करीतबसती हर्षें ।
सार्धप्रहरीं[1] भोजन करितां, आप्तांसह संतोषें ॥ ३६१ ॥

दिंडी.

पाटरांगा रांगुळ्या रम्य पानें ।
शाक चटण्या कोशिंबिरी हरीनें ।
भजीं पापड पापड्या सांडगे ही ।
घृत द्रोणीं ओदनीं वरण राही ॥ ३६२ ॥

साकी.

बुंदी जिलब्या दळया बेसन, मोतीचुर पक्वान्ना ।
वाढित असती चंचलनयना सिंहकटी स्वाद्वन्ना ॥३६३॥

दिंडी.

पंक्तिमध्यें सुंदरी चमकताति ।
पाहिजे तें पक्वान्न वाढिताति ।

---

१ दीडप्रहर दिवसास.

मिष्ट मठ्ठा शेवटीं मधुर भातीं ।
वाढिती मग संतुष्ट पुरुष होती ॥ ३६४ ॥

साक्या.

भोजन पक्कान्नां-सह करुनी विड्यास घेती तोषें ।
द्यूत-क्रीडा करीत बसती मित्रांसह संतोषें ॥३६५ ॥
एकसारखे खेळत बसती सूर्यास्तापावेतों ।
फराळ अटपुन सुवेष जाती दीपोत्सव बघण्या तो॥ ३६६॥

दिंडी.

दीप-पंक्ति प्रतिगृहीं निशीं थाट ।
त्यांत फार चि देवळीं चकचकाट ।
किती दारू सोडिती मुलें थोर ।
तींत आकृति बहुरंग खुबीदार ॥ ३६७ ॥

मालिनी.

पुरुष मग निशीं ही द्यूत-केली करीती ।
सुखित तरुणवेश्या-गान ऐकून होती ।
मुदित कितिक होती पाहुनी त्यां विलासी ।
करिति सुखद लीला देउनी द्रव्य त्यांसीं ॥३६८॥

शार्दूलविक्रीडित.

वेश्यांचा वरपंगि थाट बघुनी त्या लुब्ध होती जन ।
देती वस्त्रविभूषणांसि, करिती तत्प्रीतिसंपादन[1] ।
द्रव्याच्या बहु राशि ओतुनि पुढें, सार्थक्य ते मानिती
स्वस्त्रीच्या करितात काटकसर प्रत्येक-वस्त्रा किती ! ॥
द्यूतक्रीडन सुंदरीसह करी लावी विलासी पण ।
कांताचुंबन जिंकिलें प्रियतमें तैसें हि आलिंगन ! ।

---

१ वेश्यांच्या प्रीतीचें संपादन.

कांतेतें प्रिय हृद्य-केलिकरण्या हर्षे पणातें पुसे; ।
मावेना हृदयांत हर्ष, रमणी गेली सुमंचीं मिसें ! २७० ॥

दिंडी.

अशापरि ते चारीं हि दिनीं सौख्य ।
विलासी जन भोगिती असे विख्य ।
अमावास्या-दिनि फार रम्य शोभा ।
असे; लक्ष्मीपूजनीं प्रदीपाभा ॥ २७१ ॥

शिखरिणी.

जिच्या सामर्थ्यानें कुमति, सुजनीं मान्य असती ।
सुधी, मानें सौख्यें रहित यदभावीं बघ किती ! ।
कला, विद्या, ही त्या विफल; सुत, दारा न पुसती ।
सुखाचें शोभेचें अतुलगृह लक्ष्मी विलसती ॥ २७२ ॥

शार्दूलविक्रीडित.

श्रीमद्भाषण अप्रमाण अथवा निर्युक्त त्या मान्यता ! ।
युक्तींनीं युत सप्रमाण विबुधोक्ती तुच्छ हि तत्वतां ।
लक्ष्मी कारण ह्या असे तिजविणें सर्वांगुणां अल्पता ।
थाटानें तिज पूजिती जन पहा आली दिवाळी मता २७३ ॥

साकी.

लक्ष्मीपूजन गृहीं गृहीं परि, धनिकगृहीं बहु थाट ।
तशी दुकानीं शोभा फार च बघण्या गरदी दाट ॥ २७४ ॥

शार्दूलविक्रीडित.

लक्ष्मीचे बहु ढीग, मांडुनि पुढें त्या पूजिती शेटजी ।
पूजा सांगति दक्षिणाश मिळण्या पैसा तयां भट्टजी ।

---

१ मनांतली. २ मूर्ख. ३ विद्वान्. ४ लक्ष्मीच्या अभावीं. ५ असंबद्ध. ६ मान्य. ७ दक्षिणेची आहे आशा ज्यांना.

मोठे [1]तुंदिल शेट नाभि जणुं कीं त्वन्न्यासगर्तां[2] रमे[3] ।
मूढां त्यां वश तूं तशी न विबुधां[4] आश्चर्य आह्मां गमे ३७५॥

दिंडी.

किती हंड्या झुंबरें भिन्नरंगीं ।
लागल्यानें फांकतें तेज रंगीं ।
मधुर-वाद्यें वाजती अशा रीतीं ।
धनिक पूजा सानंद हो करीती ॥ ३७६ ॥

मालिनी.

खुलति बहुत मुक्ता राजतीं तेथ ताटीं ।
मधुन खुलतसे ही स्वर्ण तेथें सपाटी ।
चकचक रुपयांचे ढीग लागून ठेले ।
ज्वलित-बहुत-दीपीं तेज फांकून गेलें ॥ ३७७ ॥

साकी.

साळी-लाह्या बत्तासे ही तांबूलांतें देती ।
निमंत्रितांतें, जो येई त्या, देउन धर्म करीती ॥३७८॥

दिंड्या.

रुसुन बसती सुंदरी पाडव्यास ।
प्रिया-करवीं करविती भूषणांस ।
पतिस हांसत ओवाळितात थाटीं ।
विनोदासह भूषणां घेति ताटीं ॥ ३७९ ॥
द्वितीयेसी बंधूस मेजमानी ।
करुनि बहिणी ओवाळितात सोनीं ।
बंधु घाली ओवाळणीस ताटीं ।
दिसे प्रीति दोघांत फारमोटी ॥ ३८० ॥

---

१ मोठ्या पोटाचे २ तुझ्या ( लक्ष्मीच्या ) न्यासाची=पैसा पुरून ठेवण्याची गर्ता=खांच. ३ हे लक्ष्मी. ४ विद्वानांस.

साक्या.

चातुर्मास्यीं शोभा त्यांत हि फार चि कार्तिकमासीं ।
सुखकर शोभाविशिष्ट ऐसा नाहीं द्वादशमासीं ॥३८१॥
प्रात:स्नानाकरितां जाती नदिवर लोक पहाटीं ।
रमणी वेणी घालुनि नटुनी सहर्ष जाती घाटीं ॥३८२॥
मुलें हि दवडत खेळत जाती अत्युत्सुक तीं वाटीं ।
महानदीच्या तीरीं स्नाना होते फार च दाटी ॥३८३॥

दिंड्या.

देवळामधिं रांगुळी दिसे वाटे ।
दिव्यमूर्ती पाहुनी प्रेम दाटे ।
दीपशोभा रात्रींत मनोहारि ।
पाहतांची देतसे हर्ष भारी ॥ ३८४ ॥

सर्वमासीं राहते सुशोभा ही ।
पौर्णिमा-दिन अत्यंत मना मोही ।
पुरुष जाउन पोहती नदी-पात्रीं ।
स्नान करिती अल्पोदकीं सुगात्री ॥ ३८५ ॥

उपेंद्रवज्रा.

उड्या जलीं धांवुन टाकिताति ।
अनेकरीतीं जन पोहताति ।
बुडून मध्यें निघताति दूर ।
किती उताणे तरती समोर ॥ ३८६ ॥

साकी.

बसूनि सुमुखी स्नानें करिती वदनें विधु दिसतात ।
किंवा भ्रमरावृत कमलें तीं वेणीसह खुलतात ॥३८७॥

मालिनी.

चपल कुचयुगाशीं खेळती फारवेळ ।
अति[1]शुचि असुनी ही, चुंबण्या जाति गह्ल ।
जणुं सुखित तरंग स्त्र्यंगे[2]-लीला करीती ।
विरल समयिं लोकीं राहते सभ्य-रीति ॥ ३८८ ॥

साकी.

कितीक धार्मिक संध्या-पूजन करीतबसती घाटीं ।
रमणी गंगा पूजुनि, कागद-दिव्यांस सोडिति लाटीं ॥

दिंड्या.

तरंगावर शोभती दिवे फार ।
तरंगूनी चालती मनोहार ।
जलीं बिंबें बिंबून हालताती ।
दीप-बाहुल्या-भास मना देती ॥ ३९० ॥

किती नियमी अटपुनी स्नान-संध्या ।
पुष्प-तुलसी घेऊन बिल्व गंधा ।
पूजिती ते मा[3]धवोमा[4]धवांतें ।
कृपें त्यांच्या पावती मंगलांतें ॥ ३९१ ॥

साक्या.

सुमुखी स्वकरीं पात्रें घेउनि अनेक देवां जाती ।
नमूनि तेथें रांगूळीतें काढुनि मागें येती ॥ ३९२ ॥

सायंकाळीं हंड्या झाडें झुंबरें प्रदीप दाट ।
देवागारीं वाजंत्र्यांचा सुस्वर कितीक थाट ! ॥ ३९३ ॥

मध्यें मध्यें सुरेख उडती कारंजीं शतधारीं ।
चित्रें रंगित पौष्प गालिचे दिसते शोभा भारी ॥ ३९४ ॥

---

१ पवित्र. २ स्त्रियांच्या अंगाचेठायीं क्रीडा. ३ विष्णु. ४ शिव.

वसंततिलका.

दैत्येंद्र जो त्रिपुर मारियला शिवानें ।
ह्या वासरीं ह्मणुनि त्या अबला रतीनें[1] ।
वाती किती त्रिपुर-नामक लाविताती ॥
जाळून ईशरिपु, दाविति कीं स्वभक्ती ॥३९५॥

मालिनी.

खुलति चकचकाटें देवळें रम्य पाहीं ।
सुटत बहुत दारू चंद्रजोती नळे ही ।
सणणण गगनातें बाण भेदून जाती ।
ह्मणुनि च पडती कीं रम्य तारे सुकांती॥३९६॥

---

## हेमंतऋतुवर्णन.

इंद्रवज्रा.

प्राण्यांस सर्वां स्वकलेंत गोंवी ।
हेमंत अंगां बहु कंप लावी ।
यत्नाविणें सीतल वारि[2] ठेवी ।
भोगार्हरात्री अतिदीर्घ दावी ॥ ३९७ ॥

हेमंत-रात्री हिमशुभ्र-दंता[3] ।
हे तारकों[4]-चंचलदृष्टि कांता ।
गाढांधकेशा[5] द्विगुणा[6] हि राहे ।
मत्तांगनेच्या[7]परि मंदगा हे ॥ ३९८ ॥

---

१ भक्तीनें. २ उदक. ३ बर्फच आहेत व बर्फासारखे आहेत शुभ्र दंत जीचे. ४ डोळ्यांतील बाहुल्या, नक्षत्रें. ५ दाट अंधकारच आहे केश जीचे, अंधकारासारखे इ०. ६ दुप्पट, दोन आहेत गुण रज आणि तम जीचे ठायीं. ७ स्त्री.

आर्या.

त्वत्कृति हे हेमंता, क्वचित चि ते सौख्य देइ कोणास।
सौख्यद हो स्त्रीयुक्ता तापद त्या यत्कलत्रं कोणासं३९९

त्वत्करणी हेमंता, वाटे मज गर्हणास्पदा कांहीं।
द्विजें शुचि कांपवुनी रे अपटिसि बहु त्यांस आपदा कां ही!

साकी.

संपूर्णांगें थंडीनें तीं खुडखुड काकडताती।
दंतांवरतीं दंत हि अपटुनि तडतड सुशब्द होती४०१

दिंडी.

शीत मारुत वाहतो शीत धूली।
थंड वस्त्रें जणुं वाटताति ओलीं।
शीत उदकें झोंबती सर्व-देहीं।
अग्निची ही नचले च शक्ति कांहीं॥ ४०२॥

साक्या.

अति-शीतानें उदकावर तो दिसतो पडदा दाट।
शीतभयें जल पासोडीतें पांघरतें कीं घट्ट॥ ४०३॥
अग्नीची ही दाहक शक्ति प्रनष्ट हेमंतीं ते।
निकटस्थापित दहन जरी ही थंडच वाटे सीतें॥४०४॥
अन्य ऋतूंची दहशत नाहीं हेमंताची राही।
ज्याला थरथर नर पशु पक्षी कांपत असती पाहीं४०५

आर्या.

श्वानें चुलिच्या मध्यें, डोळे मिटुनी सकंप बसतात।
करचरणांगां उदरीं, कूर्मापरि जंतु ही अखडितात४०६
सस्त्री-बालक मानव, करुनी ज्वलितेंधनाग्नि तो संविध।

१ स्त्री. २ कोपरा. ३ निंद्य. ४ ब्राह्मण, दंत. ५ पवित्र, शुभ्र. ६ अग्नि. ७ कासव. ८ पेटलेलीं इंधनें=काष्ठें त्यांचा. ९ जवळ.

शेकत बसती हर्षे, हाहा हुहू करून ते विविधे॥४०७॥
पुरुष स्त्रिया हि बालक, हात पुढें करुनि शेकती बहुत।
कीं प्रार्थिती हुताशा, सीताचें तूं प्रभो करीं च हुत४०८

शार्दूलविक्रीडित.

पक्षी वानर कांपती थरथरां वृक्षावरी बैसती।
उड्डाणीं कृतनिश्चय स्वनयनां झांकून ते राहती।
शीतानें पशु आर्त होउन तृणा टाकून हो पाहती।
प्राणी सर्वच शीत-पीडित असे कर्तव्य ही सोडिती४०९

साकी.

लतादलांवर हिमकण शीतल शुभ्र हि दिसती फार।
ऋतु-संगें श्रमबिंदु च पडले अंगावर किं अपार!४१०॥

आर्या.

भोगुनि हेमंतें कीं, मुक्तामाला च अर्पिल्या लसती।
किंवा तापविनाशक औषधगोळ्या प्रियें दिल्या असती॥

वसंततिलका.

धान्यें खळ्यावर ढिगावर ढीग ठेले।
त्यांतें मळून कृषिकांहिं तयार केले।
राशी अनेक करुनी स्वगृहास नेले।
लक्ष्मी गव्हा-हरभऱ्यावरि तैं च डोले॥४१२॥

मालिनी.

हरितें हरित धान्यें सौख्य दृष्टीस देती।
हलति बहुत ओंब्या रम्य वाटे सभोंती।
प्रिय-युत जन ओंब्या मिष्ट खाती हुळा ही।
रुचिकर बहु लागे गोड जाती अर्धी ही॥४१३॥

---

१ अनेकप्रकारें. २ अमीस. ३ शेतकरी. ४ हिरवी.

शिखरिणी.

जशी नारी जातां स्वपति परदेशास विरहें ।
उदासीना होते त्यजुनि सुखभोगास कृश हे ।
वनांच्या संयोगें सरुचि वन-लक्ष्मी खुलतसे ।
वियोगानें फिक्की अनुदिन कृशा ही दिसतसे ४१४

शार्दूलविक्रीडित.

अन्यर्तूंत तशी नसे चव जशी हेमंतिं अन्ना असे ।
पाणी शीतल मिष्ट निर्मल मना संतोषवी ही तसें ।
वस्त्रें रूभरि लोंकरी मृदु जना देती किती सौख्य तीं ।
मृद्वंगी-तनु-संग-सौख्य मनुजा ह्यामाजि होई अती४१५

वसंततिलका.

जातें भरून जिकडेतिकडे धुकें तें ।
प्राण्या दिसे न जरि वस्तु समीप ही ते ।
कीं शत्रुचा उगविण्या जणुं सूड शीतें ।
हा कोंडिला ज्वलन-धूम्र गमे च मातें !॥४१६॥
गोठून जाइ पडतां बहु थंडि पाणी ।
हो शुभ्र बर्फ जशि कीं बरफी च जाणीं ।
अंगामधें हुडहुडी भरुनी अनेक ।
प्राणी फडाफड हिवें मरताति देख ! ॥४१७॥

मंदाक्रांता.

तूं हेमंता गमशि मजला पारधी रे कठोर ।
थंडी जाळें जणुं पसरुनी मारिशी जीव फार ।
पक्षी जातां उडुनि हणिशी त्यांजला थंड गोळ्या ।
पृथ्वी-पृष्ठीं अपटिशि तयां धाडकन् जेंवि मोळ्या ४१८

---

१ तेजस्वी. २ दररोज. ३ अग्नीचा. ४ अग्नि.

वसंततिलका.

आहेत लोकिं रसं पातळ ते अनेक ।
उष्णेंकरून करिती घन त्यांस लोक ।
आहे तुझी च कृति एक अनन्यगम्य ।
शीतें हि घट्ट करिशी जल तूं च धन्य ! ॥४१९॥

सूर्याग्नि घट्ट करण्या झटती जलातें ।
रूपांतरासि धरुनी परि जाई हो तें ।
दोघे हि तापति तथापि उपाय-शून्य ।
जागीं जडा अवळिसी घन तूं च धन्य ॥ ४२० ॥

कंटाळले जन तुला जरि बा अतां रे ।
गेल्यावरी गुण तुझे स्मरतील सारे ।
नोष्मा कधीं, सततनिर्मल तोय थंड ।
रात्री सुखाध्ययन-योग्य जरी प्रचंड ॥ ४२१ ॥

इंद्रवज्रा.

उद्योगमग्नास करी च गोडी ।
हें शीत त्यांना न कदापि पीडी ।
आलस्य सोडूनि तुम्ही म्हणूनि ।
नित्य प्रयत्नांस करा झटूनी ॥ ४२२ ॥

भुजंगप्रयात.

हिमें झांकलेले किती थंड-देशीं ।
वनीं पर्वत प्रोच्च ते श्वेत-वेशी ।
जणूं थंडिनें फार होऊनि भीत ।
सदूर्णांशुकानें च आच्छन्न होत ॥ ४२३ ॥

---

१ जगांत. २ दुध, उसाचा रस आंब्याचा रस इ०. ३ घट्ट. ४ दुसऱ्याला न साधणारी. ५ लोंकरीच्या वस्त्रानें. ६ आच्छादित.

मंदाक्रांता.

बर्फानें हें नव जणुं दिसे पांढरें विश्व देख ।
कैलासाचेपरि गिरि तसे वृक्ष छत्रें सुरेख ।
[1]नीरें दुग्धापरि दिसति हीं श्रीफलें शंखभाती ।
मुक्ताहारासम सकलही शोभती वेलजाती ॥४२४॥

आर्या.

मार्गक्रमण्या लोकीं, जागृत केला जरी पथिक वाटे ॥
कर पद पोटीं लावी, त्यातें उठण्यास दुःख बहु वाटे४२५

शार्दूलविक्रीडित.

चाले शीतल वायु, शीत हि तसें अंगास पीडा करी ।
कुंदीं आणि नवारविंदिं बकुलीं भृंगालि गुंजी करी ।
शीता नाशि जयाचिया जवळि ह्या काळीं न हो सुस्तनी
दुर्दैव्या क्षणदा युगापरि तया होती व्यथा-दायिनी४२६

शिखरिणी.

गृहीं पांथा, रामा त्यजुन परदेशास निघशी ।
प्रिया नाहीं, [2]वा [3]तद्विरहदहनाऽविज्ञ असशी ।
अरे ! कालीं ऐशा कुठुनि मग सोडूनि तिजला ।
सुचे जाणें कोठें; मरण च जणूं नेत तुजला ! ॥४२७॥

मालिनी.

पर[5]ष वच [6]न पांथा, मानसीं त्वां धरावें ।
स्वसदन-रमणीतें जाउनी, तोषवावें ।
सुखदमदन-लीला शीतकालोचिता त्या ।
करुन, सुखित हो रे, फीर मागें सुकृत्या ॥४२८॥

---

१ उदकें. २ अथवा. ३ तिच्या विरहाग्नीला न समजणारा (नपुंसक). ५ कठोर. ६ नचा संबंध धरावें–इकडे.

वसंततिलका.

वाहे समीरेण सुशीतल मंद शांत ।
नाना-सुमांतिल सुवास मरंद घेत ।
कालीं अशा नर सुखी रमतात कांहीं ।
जे धन्य मर्त्य तरुणीसह रम्य-गेहीं ४२९ ॥

मालिनी.

सतत पिहित राहे द्वार अंतर्गृहाचें ।
ज्वलित दहन राहे नेहमीं दीप्त साचें ।
मृदु वसन उबेचें सर्व अंगांत आहे ।
जवळ मृदुलगात्री सीत कोठून राहे ॥ ४३०॥

शालिनी.

सौख्या देई सेवितां ती हॅसंती ।
हेमंतीं ती सुंदरी ही हसंती ।
पूर्वीऽभावीं अल्प सीतार्ति होते ।
अन्योऽभावीं दुःख अत्यंत हो तें ॥ ४३१ ॥

मालिनी.

बहुत कुपित झाल्या सुंदरी ह्या दिनांत ।
तरि हि ऋतु तयांचा कोप राहूं न देत ।
दिनभर बसती त्या रोषयुक्ता न रात्रीं ।
करुन मिष हिंवाचें, भर्तृसक्ता सुगात्री ॥ ४३२ ॥

शार्दूलविक्रीडित.

"पीडी दैव सुदुर्बळां" स्मरण हें होई मला पाहतां ।
सच्छिद्रां-शुक-युक्त-निर्धन जनां हें शीत हो बाधितां ।

---

१ वारा. २ निखाऱ्यांनीं भरलेली शेगडी. ३ शेगडी नसली तर. ४ हसणारी स्त्री नसली तर. १ भोंकें पडलेलीं वस्त्रें त्यांनीं युक्त.

जेथें तें दृढ गेह ज्यांत वसती श्रीमंत ते सर्वदा ।
तेथें शीत न जातसे जरि हळूं गेलें न पीडी कदा ४३३

आर्या.

द्युमणि[1]-प्रकट[2] न होतां, कमलाकरें[3] सद्गुणी[4] मुदित होती।
तिमिरादर्शनयोगें[5][6] चक्षुष्मत्ता[7] कृतार्थ[8] होते ती ॥४३४॥

शिखरिणी.

यदाविर्भावानें[9] सकलतम तें दूर पळतें ।
बहूत्साहानें हें जग सकल-कर्मांस करितें ।
स तेजस्वी पाता[10] पर[11] सकल-जीवां बंधु मनीं ।
त्या मित्राचें सं-क्रमण[12] मकरीं[13] पौष-सुदिनीं ॥४३५॥

मंदाक्रांता.

संक्रांतीचा सण जंव पुढें राहतो एक-मास ।
तेव्हांपासूनि च विधुमुखी सांगुनी हो प्रियांस ।
धुव्वा खाशी पति कडुनियां शर्करा आणवीती ।
रामा कामा करुनि, हलवा सुंदरी त्या करीती॥४३६॥
उत्कंठेनें प्रथम करिती शर्करा-पाक रामा ।
कौशल्यानें विमळ[14] करिती त्या तयाला सुकामा ।
ज्या गोऱ्या ही असुन करिती प्रत्यहीं निर्मलांग ।
त्यांची राहे कुठुन मलिनाच्या वरी प्रीति सांग॥४३७॥

शिखरिणी.

प्रपंचाची हौशी सकलजगतीं ती च सुकटी[15] ।
चतुश्चक्रासज्जा[16] करि भरुन अंगार[17] शकटी[18] ।

---

१ सूर्य, रत्न. २ उदय. ३ सरोवरें, सावकार. ४ कमलतंतूंनींयुक्त, गुणवान् (पारखी). ५ अंधार, डोळ्यांतील बुरा. ६ अभाव. ७ नेत्रांचें अस्तित्व. ८ सार्थक. ९ ज्याच्या उदयानें. १० रक्षक. ११ अन्य. १२ गमन. १३ मकरराशीस. १४ निर्मळ. १५ स्त्री १६ तयार. १७ निखारे. १८ शेगडी.

धरूनी ओढाया खळ खळ तिला सांखळ असे ।
हळू ओढी तीतें जवळ मधिं विस्तू रसरसे ॥ ४३८ ॥
दिनीं हेमंताच्या सुख करि च अंगार-शकटी ।
ह्मणूनी रामा त्या मुदित बसती फार निकटीं ।
वरी सत्पात्रांतें चढवुनि बिया तीळ वरतीं ।
सुपाका घालूनी हळु फिरविती त्यांस सुदती ॥४३९॥

मंदाक्रांता.

मृद्वंगी त्या हळु च हलवा अंगुलींनीं करीती ।
पात्रांमध्यें तरि हि हलवे हेलकावे च घेती ।
ज्या, दृक्‌प्रांतें सकल-जगता सुंदरी हालवीती ।
हस्तस्पर्शें भ्रमविति तयां, काय आश्चर्य देती? ॥४४०॥

दिंडी.

सुंदरी ते हलव्यास करित राहे ।
तदंगावर कांटा हि उभा राहे ।
सुगात्रीच्या मृदु अंगुलिच्या स्पर्शें ।
सरोमांचित होतसे जणूं हर्षें ! ॥ ४४१ ॥

शिखरिणी.

मृदु-सुखद-करानें निर्मितां, कोमलांगी ।
बहु खर हलव्या रे ! कंटकां स्वीय अंगीं ।
प्रकट करुनि त्यांच्या अंगुली पीडितोसी ।
मलिन-हृदय यांची रीति राहे च ऐशी ॥ ४४२ ॥

दिंड्या.

स्नेहबीज च लाविती त्या सुकालीं ।
पात्र-मध्यें सितशर्करालवालीं ।

१ बोट. २ पापी, ( पक्षीं ) मलिन ( काळा तोळ ) आहे हृदयीं ( आंत ) ज्यांच्या. ३ प्रीतीचें बीं, तीळ. ४ शुभ्र. ५ आळें.

स्नेहजल ही घालिती सदा भारी ।
अंकुरोद्भव होतसे मनोहारी ॥ ४४३ ॥
अंकुरोद्भव बोलतां जरी त्यांतें ।
होतनाहीं तद्वृद्धि कां ? वदा तें ।
त्यांस बाला अंगुली लाविताती ।
उतावळिनें कुंठिता गती होती ! ॥ ४४४ ॥

स्रग्धरा.

त्रैलोक्यीं शक्ति ऐशी अघटित अबलांसारखी पाहिली ती
पात्रीं बीजास लावी, करुनि रसअळें कीं जल स्नेह ओती
त्या लावी हस्त-शाखा, मृदुलसुमनसें युक्त, भृंगाक्षिनीं ही
ऐसा तो स्नेह-शाखी बनवुन हलवे सत्फलें तोडिते ही॥

साकी.

सुगंधि सुंदर केशररंगित, अनेक-रंगी कांहीं ।
सुमुखी हर्षें हलवा करिते फारच शोभा पाहीं॥४४६॥

वसंततिलका.

"येताति सद्गुण गुणप्रिय-संगमें ते" ।
हें वाक्य सार्थ हरिणाक्षि-कृतींत होतें ।
सस्नेह सर्वगुणयुक्त तिचें हि चित्त ।
सामोद, ते च उठति गुण हालव्यांत ॥४४७॥

आर्या.

सक्रांतीचा सण तो, आला अदले दिनीं च ये भोगी ।

---

१ प्रेम. २ अंकुरांची वाढ. ३ विलक्षण. ४ हस्त ह्याच फांद्या. ५ मन, पुष्प. ६ भ्रमरासारखे नेत्र. ७ प्रेम, तिळ. ८सार्थक. ९ स्त्री-च्या कृतींत (हालव्यांत). १० प्रेमयुक्त, तिलस्नेहयुक्त. ११ सत्व रज तमोगुणयुक्त, शुक्ल, रक्त इ० रंगांनीं युक्त ( हालवे ). १२ आनंदयुक्त, सुवासयुक्त ( केशराचा सुवास असतो ).

सुगंधि तैलें वस्तू अंगा लावून न्हाति गौरांगी ॥४५८॥
मिष्ट सुवासिक खिचडी, सगळीं वांगीं पदार्थ बहु पुरुषा
घृत ही वाढुन नंतर, भोजन करिताति अंगना अरुषा[1]
सघृतान्नानें होतो, शीतार्तिविनाश म्हणुनि त्या प्रमदा ।
आग्रह करूनि घनघृत, वाढिति जें वाढवी च शक्तिमदा

साक्या.

सायंकाळीं नवीन लुगडीं, चोळ्या नटून लेती ।
एकीमेकी प्रीतीनें त्या, भोगविड्यांतें देती ॥ ४६१ ॥
सप्त च पानें, सप्त सुपाऱ्या, सप्त लवंगा, सप्त ।
दोडे, देती, सप्त-विड्यांतें सुवासिनींतें सप्त[2] ॥४६२॥
रतिदेवीच्या तोषें होते प्राप्ती भोग[3]विड्याची ।
म्हणूनि देती तत्प्रीतीस्तव दानें भोगविड्यांचीं ॥४६३॥

वसंततिलका.

पंचेषु[4]-दीप्तदहनें जणुं भीरु तप्त ।
दानें शमास करिती रमणींस सप्त ।
बाणांस पंच[5], अणखी रति-मन्मथांस ।
एकैक[6], हा च जमतो बघ मेळ खास ॥४६४॥

साक्या.

संक्रांतीच्या दिवशीं मानव, वाटुन तिळ अंगांतें ।
प्रातःकालीं लावुन करिती, स्नानें नित्य-विधींतें॥४६५॥
अमदाबाजी चंद्रकळा त्या यवल्याच्या साड्या ही ।
तरुणी रमणी रम्य फुटाणी नेसुन नटती कांहीं४६६॥

---

१ रागरहित. २ सुवासिनीचें विशेषण. ३ उपभोग. ४ मदनप्रदीप्तअग्नीनें. ५ पांच बाणांला पांच. ६ मदनाला, रतीला.

दिंड्या.

भूषणांनीं सुंदरी नटुन झोंकीं ।
हळदकुंका देतात एकमेकी ।
कितिक वाणें देतात बहु प्रीत्या ।
सुखदसौभाग्याच्याच अधाशी त्या ॥ ४५७ ॥
हळदकुंकूं सौभाग्य-सौख्य-कामा ।
अवे पूजुन लुटविती, करुनि कामा ।
स्त्रिया गडबड करितात किती सोस ।
भीरु निर्भय लुटताति राजरोस ॥ ४५८ ॥

आर्या.

अबला कितीक दानें, करिती, देती वधूंस [1]रसरंगा ।
दानीं रतिपति[2]देवा, तोषवुनी पावतात रस[3]-रंगा॥४५९॥
पक्वान्न-मिष्ट-भोजन, साप्तस्त्रीसुत करून हर्षानें ।
तिसऱ्या प्रहरीं निघती, तिळगुळ देण्यास थोरजन सानें

दिंडी.

गोफ कंठ्या कंठांत त्या अमोल ।
अंगठ्यावर चमकती हिरे लाल ।
किती रेशिमकांठीहि धोत्रजोडे ।
नवे खुलती पायांत लाल जोडे ॥ ४६१ ॥

साक्या.

किती बनाती अंगरखे ते तऱ्हेतऱ्हेचे अंगीं ।

---

१ एका खोबऱ्याच्या वाटींत कुंकू व एकींत गूळ घालून त्या पदराखालीं झांकतात आणि 'रस घ्या व रंग द्या' असें बोलून दोन्ही वाट्या सुवासिनींच्या हातीं देतात. त्या गुळाची वाटी ( रसाची ) ठेवून ( रंगाची ) कुंकाची परत देतात. २ मदन. ३ शृंगाररसांतील रंग.

कशांस गोंडे, वस्त्रें खुलती कितीक नानारंगी ॥४६२॥
नारळिपदरी दशासहित जर ज्यां ऐशीं पागोटीं ।
अब्बाशाई कुसुंब-रंगित दिसती सुरेख मोठीं॥ ४६३ ॥

दिंडी.

डबे हातीं अभ्रकी कागदी ही ।
त्यांत हलवा अत्यंत खुलत राही ।
प्रथम देवां जाऊन अर्पिती ते ।
नमन करुनी हलव्यास भक्तिनें ते ॥ ४६४ ॥

साक्या.

'तिळगुळ घ्या' हें बोलुनि नंतर ह्मणताती 'गोड्बोला'।
हलवा देउन नमस्कार जन करिती परस्परांला ॥४६५॥
श्रीमंतांच्या स्वाऱ्या निघती मार्गीं गरदी दाट ।
हत्ती घोडे झुलती कोठें असतो मोठा थाट ॥ ४६६ ॥

मंदाक्राता.

लाडें चौडे करुन वरती चालती ज्यांत तोडे ।
वाळा माळा खळखळत ते, आखडीतात तोंडें ।
अंगीं रंगीं खुलत गजनीं लाल खोगीर गोंडे ।
ऐसे खासे निघत असती रम्य संपन्न घोडे ॥ ४६७ ॥

मालिनी.

सधन पुरुष ऐटीं बैसती अश्व-पृष्ठीं ।
चमकति जरि शाली अंगठ्या रत्न-कंठी ।
हलति तुरगपादीं भूषणें आणि अंगीं ।
दवडत हलव्यातें घेउनी दूत मार्गीं ॥ ४६८ ॥

पृथ्वी.

सहर्ष जन जाउनी प्रियसुहृज्जनांच्या घरीं ।
परस्पर नमून ते तिळगुळांस देती करीं ।

गृहस्थ सदनागतां बसविती सुखें बैठकीं ।
वदून मृदुभाषणें, मग विड्यांस देती सुखी ॥ ४६९ ॥

साकी.

सुखकर भाषण बोलुन नंतर जाती अन्य-गृहातें ।
ह्या-रीतीनें हलवा देती स्वगृहीं ही आप्तां ते ॥ ४७० ॥

शिखरिणी.

फराळातें रात्रीं करुनि जन सानंद बहुत ।
विडे घेती जाती मृदुसुखद तल्पीं सुखयुत ।
घरी पेला तांब्या जलभरित हातांत सुमुखी ।
सुवेषा येती त्या चमकत हिऱ्यांची लखलखी॥४७१॥

इंद्रवज्रा.

मंचीं मृगाक्षी बसती सुगात्री ।
ज्या दृष्टिमात्रें स्मरतापदात्री ।
लाजूनि हर्षें हलवा प्रियांला ।
देती ह्मणोनी मग "गोड बोला." ॥४७२॥

वसंततिलका.

हें सुंदरी-मधुरभाषण फार गोड ।
लागे प्रियास अमृतावर तेहि तोड ।
सांगूं कितीतरि रुची मग हाल्व्याची ।
नाहीं तयास तुलना त्रिजगांत साची॥ ४७३ ॥

दिंडी.

किती हौशी सुंदरी प्रियमुखांत ।
प्रीतिनें त्या हलव्यास घालितात ।
किती लागे मधुरता रुचि तयाची ।
सर्व गोडी सुंदरी-मृदुकराची ! ॥ ४७४ ॥

---

१ घरीं आलेल्या लोकांस.

साकी.

प्रिय ही तेव्हां उल्हासानें, सुमुखी-मुख-कमलांत ।
हलवा घालुन लगेच चुंबन करिती त्या- संधींत ४७५॥

वसंततिलका.

चुंबी सुगल्ल सहसा प्रिय, चंचलाक्षी ।
चंद्रानना हिसकुनी मुखकंज, लक्षीं ।
भ्रूचाप ओढुनि दृगंतशरास मारी ।
त्यातें परंतु अधरामृत एक तारी ! ॥ ४७६ ॥

साक्या.

तांब्यांतिल जल पीउनि नंतर, रमणी विडा प्रियांला ।
देउनि आपण घेती; मग ते करिती विनोदलीला ४७७॥
दुसरे दिवशीं किंक्रातीला, रमणी नटूनि देती ।
एकीमेकी चातुर्यातें दावित हलवा प्रीतीं ॥ ४७८ ॥

## शिशिरऋतुवर्णन.

आर्या.

शिशिरीं सीत लयातें, जातां जंतूस दुःख तें करितें ।
अधिकारी जे कुमती, जातां जातां हि ताप करिती ते।
जातांना सीत लया, प्रवृद्ध होतें च चेतनांस्नेह ।
दीप जसा क्षयकालीं, वृद्धीतें पावतो विना स्नेहें॥४८०॥

साक्या.

ऋत्वर्धाच्या नंतर सीत हि, हळु हळु निघून जातें ।
उष्ण-शत्रुची स्वारी लवकर येइल, भिऊनि कीं तें ? ४८१
धान्यें ताटें आदिकरूनी खटला घेउनि जाते ।
लक्ष्मी ह्मणुनी उदासीनता शिशिरा तुजला येते ४८२॥

---

१ चेतन सजीव प्राणी त्यांचा नाहीं स्नेह प्रीति ज्याचे ठायीं. २तेल.

वसंततिलका.

गोधूमधान्यचणकांवरचीहि लक्ष्मी ।
जाई त्यजूनि विपिना शिशिरीं स्वधामीं ।
जी कीं असे सकलभूषण ती च जातां ।
शोभा कुठूनि मग राहिल तेथ आतां ॥४८३॥

आर्या.

लक्ष्मी त्यजुनी जातां, विशोभ शिशिरा, पहा तुझ्या ठायीं
धनधान्यर्द्धि हि जाउनि राहे अवशिष्ट धूळ त्या ठायीं॥
शिशिरा श्रीविण जीवन, व्यर्थ तुझें वाटतें मज विरामा
जाणुनि हें च विधीनें, अपमानें योजिलें तुज विरामा॥

शिखरिणी.

गृहातें टाकूनि क्षणभर च जातां हि रमणी ।
नवी वस्तू वाटे विकल सदनीं ही भणभणी ।
उदासीनत्वानें मनुज यदभावीं भटकती ।
वनश्री स्त्री नाहीं तुज कुठुनि शोभा विलसती॥४८६॥

वसंततिलका.

तूं जीर्णता लपविण्या करिशी स्वकाया ।
जाणो सुवर्णमय पीत करून माया ।
लक्ष्मीस मोह करण्या बरि युक्ति केली ।
नाहीं परी तुज गड्या तरि साध्य झाली४८७॥
जीर्णा त्वदीय तनु पत्रमिषें गळे ते ।
पाहोनि कृत्रिम तुझी कृति चंचला ते ।
लक्ष्मी त्यजून तुज जाइ पराकडेस ।
भर्ता श्लथेंद्रिय रुचे न च सुंदरीस ॥ ४८८ ॥

---

१ स्त्रीरहिता. २ अखेरीस. ३ स्त्रीच्या अभावीं.

शार्दूलविक्रीडित.

मोठाले दिसतात सोट तरु हे पर्णें न ज्यां राहती ।
जाणो स्तंभ च हे वधार्हपुरुषां[1] कीं रोंविले वाटती ।
कीं हे मुंडित भिक्षु पत्रनिकर[2]न्यासा[3] करूनी उभे ।
शोभा राजविलासिनी तिजसवें कैसें तुझें रे निभे !४८९

साकी.

खुंटावरचे ह्मणति कावळे स्त्रीसुत नसति जयांला ।
खुंटावरचे कितिक कावळे तुजमधिं दिसति अह्माला ॥

वसंततिलका.

शीतोष्णभूप इतरेतर[4]-शत्रु खास ।
झुंजा करूनि हटवीति परस्परांस ।
येतां मधें शिशिर त्याक्षणिं हो चुराडा ।
शोभा स्वकीय दवडून बसे च वेडा ॥ ४९१ ॥
विश्रांति कर्षकजनाप्रति तूं च देशी ।
अन्यर्तुमाजि न मिळे क्षण ही तयांसी ।
होती कृषीवल फिरून नव्या दमाचे ।
नाल्पोपकार तव त्यांवर होति साचे॥ ४९२ ॥
नाहीं तुझ्यांत अति उष्ण न शीत फार ।
आहेस तूं सुखद यास्तव होशि थोर ।
कार्यें अनेक करण्या दिन हे च योग्य ।
आहेत यापरि किती ह्मणतात योग्य[5] ॥ ४९३ ॥
बारे सुवर्ण[6]मय तूं घडुनी च खाशा ।
त्या मोहरांस[7] जरि दाविशि ही स्वकोशा[8] ।

---

१ वधाला योग्य. २ समुदाय. ३ त्याग. ४ परस्पर. ५ सत्पुरुष. ६ सुरेखवर्ण, सोनें. ७ मोहरा, फुलें, कळ्या ( आंब्याच्या ) ८ जामदारखाना, कळ्या.

कारागिर प्रथम तूं असतां तयांचों[1] ।
देती वसंतऋतुला जन मान साचा ॥ ४९४ ॥
सुव्यक्त कारण असे कथितों तुला बा ।
श्रीशास[2] मान जन देति न ते गरीबा ।
आहे समानकृति ही सरशी हि खाशी ।
नांवावरी च भुलती जन, रीति ऐशी॥ ४९५ ॥

साकी.

हळु हळु ते हिम जातें नंतर उष्णहि तसें च येतें ।
दोघांमध्यें चेंगरुनी ऋतु दीन-दशा कीं होते ! ॥४९६॥

आर्या.

शीतोष्णोभयधर्मा[3], संपे श्री ह्मणुनि तूं सुखें रहित ।
पर ऋतु एकच धर्मा, करिती श्रीसंग्रहा; सुखें सहित ॥
गर्मनागमनावसरीं[4], उभयाप्रातिथ्य योग्य करण्यानें ।
जाते श्री संपूनी, युक्त[5] श्रीरहितता तुला त्यानें ! ४९८

शिखरिणी.

अहंकारें विश्वा वश करुनि जाई स्मर हरीं[6] ।
तदंगा जाळूनि त्रिनयन अनंगत्व च करी ।
जगा जाळी प्राशी विष शिव करी भूषण गळीं ।
शिरीं गंगा गौरी तनुरत[7] लसे चंद्र निटिलीं ॥ ४९९ ॥

आर्या.

विषपानानंतर तो, विषाग्नि पेटून दग्ध करि तनुला ।
तच्छमना कीं शिव धरि, शीर्षी शीतांशु शीत गांग जला॥

---

१ मोहरांचा. २ श्रीच्या ( संपत्ती, शोभा ) स्वामीस. ३ दोन धर्माकडे. ४ सीताचें गमन व उष्णाचें आगमन ह्या दोन्ही प्रसंगीं. ५ योग्यच. ६ शिवावर. ७ शरीराशीं सक्त.

शिखरिणी.

कंपर्दी भक्तांतें प्रचुर धन देई नवल तें ।
जरी शूली नाशी सकलभजकव्याधि बहु ते ।
करी ज्ञानी भक्तां पशुपति पहा उग्र हि जरी ।
दयेचा जो ठेवा, शिव भव असूनी भवहरी ॥५०१॥

आर्या.

माघीं शिवरात्रदिनीं शंभूत्सव थोर सर्व जन करिती ।
देवालय भूषविती काढुनि रंगित अनेक चित्र-तती ५०२

साकया.

प्रातःकाळीं महानदीवर करिती स्नानें सर्व ।
नित्यविधीतें अटपुन नंतर पूजित बसती शर्व ॥५०३॥
रुद्र ह्मणूनी रुद्रावरती, करती जन अभिषेक ।
अहोरात्र ही अभिषेकातें करिती कितीक लोक॥५०४॥

आर्या.

शिवशांतिदाभिषेकें, भक्तज्वर दूर होइ संपूर्ण ।
सुटती कितीक तैसे भवतापापासुनी हि जे पूर्ण५०५॥

शिखरिणी.

सुपुष्पें वाहूनि त्रिदलनवबिल्वा शिवशिरीं ।
अगर्बत्या दीपावलि भजक ओंवाळिति करीं ।
किती कर्पूराची रुचि खुलतसे चंद्रशिखरीं ।
शिवप्रासादीं तैं मधुरतर हो गंध रुचिरीं ॥ ५०६ ॥

साकी.

लोक उपोषित सस्त्रीबालक शिवदर्शन करिताती ।
दुसरे दिवशीं करिति पारणें लौकर महाप्रभातीं ५०७॥

---

१ भिकारी, शिव. २ रोगी, शिव. ३ भक्त. ४ महापशु, शिव. ५ संसार. ६ शिव. ७ शिवाला शांति देणाऱ्या अभिषेकानें. ८ पूर्ण-भक्त. ९ कांति १० देऊळ.

आर्या.

शिशिरीं फाल्गुनमासीं, आला शिमगा सणांत सण थोर ।
करितात पौर्णिमेला, होळ्या सानंद होउनी फार५०८॥

होळ्या जन माध्यान्हीं, करिती कित्येक लोक सायान्हीं
पूजा करून नंतर, करमुखरव सांगतेस करिती ही ॥

शार्दूलविक्रीडित.

सीतानें जन आर्त होति, ह्मणुनी होऊन एकग्या मतीं ।
होळ्या सर्व जगीं करूनि हिम तें जाळूनि कीं टाकिती
प्राबल्या प्रभु पावला जरि, करी पीडा प्रजेतें करीं ।
ऐंकयें जे जन वागती प्रभु-कुधीचा वात त्यांचे करीं ५१०

साक्या.

खणखण डफ ते वाजत असती, ठणठण सुखकर-शब्द
बालक उत्सुक फारच करिती, घुमून राहे नाद५११॥
पक्वान्नादिक भोजन करुनी, निघती शब्द करीत ।
आस्यापास्या हुतुतू यापरि, खेळुन ते रमतात॥५१२॥
सशब्द बालक लीला करिती नाश्चर्याची गोष्ट ।
तरुण वृद्ध ही ह्या रीतीनें, करूनि होती तुष्ट !॥५१३॥
शिमग्यामध्यें लोक तमाशा बघणें ह्मणति अवश्य ।
करवुनि त्यातें नटनृत्याला होती सकल हि वश्य ५१४
रमणीरूपा धरून नट ये.नाचत भाव करीत ।
रूपभ्रांती पाडुन कितिकां जनचित्तां मोहीत ॥५१५॥
स्त्री-पुरुषांचे संभोगादिक बीभत्सोक्ति जयांत ।
नकला सोंगें लक्ष देउनी जन पाहत बसतात॥५१६॥

---

१ पीडित. २ करांनीं.

दिंड्या.

सुंदरीचें·वेषानुकरण काहीं ।
नटें करुनी जनचित्त मोहिलें ही ।
सुंदरांगी मोहिते सकललोकां ।
यांत कांहीं आश्चर्य वाटतें का! ॥ ५१७ ॥
तरुण बालक उद्युक्त पाडव्यास ।
राखमाती खेळती धुळवडीस ।
अवाच्योक्ती[1] बोलून एकमेक ।
शंखवाद्यें[2] करितात जमुन लोक ॥ ५१८ ॥

साकी.

नदीतटाका जाउन हर्षे पोहुन गृहास जाती ।
ह्याच रीतिनें सर्व ठिकाणीं चाऱ्ही दिन रमतातीं ५१९॥

दिंड्या.

शीत परलोका आप्त जणूं जाय ।
तद्दिनाशी जाळिती त्यास काय ।
क्रिया करुनी मुखशब्द अशौचानें ।
राख टाकुन करितात नदी-स्नानें! ॥ ५२० ॥
आपुल्या सणिं आहेत सभ्यरीती ।
त्यांत शिमगा जरि लोक मानिताती ।
राखमाती खेळणें शंखवाद्य ।
दुरुत्त्यन्यक्रीडा हि होत निंद्य ॥ ५२१ ॥

वसंततिलका.

स्वच्छंदताचरण इष्ट असे जनांतें ।
लोकीं विरुद्ध असतें करणें तसें तें ।

---

1 बोलण्यास अयोग्य. २ भाषणें.

हा हेतु लक्षुन जणूं सण हाच केला ।
लोकां यथेच्छ रमण्यास्तव खेळण्याला॥५२२॥

साकी.

रंगपंचमी-दिवशीं मानव चोळुन सर्वांगातें ।
स्नानें करिती चतुर्दिनांचा मल तो काढुन कीं ते५२३॥

दिंडी.

भोजनातें मित्राप्तसहित लोक ।
करुन घेती तांबूल ते अनेक ।
प्रमोदानें रंगास शिंपडीती ।
स्वच्छवस्त्रीं दिसतसे सुशोभा ती ॥ ५२४ ॥

साकी.

शिडकावाचीं स्त्रिया पातळें कर्वतिकांठीं उंचीं ।
कितीक शुभ्र च रेशिमकांठीं नेसुन नटती साचीं५२५

दिंडी.

दोरव्याच्या कंचुकया तकतकीत ।
ज्यांस खुलती जरिकांठ झकझकीत ।
अंगिं घालिति भूषणें खुबीदार ।
गोफगोंडे नव ज्यांस झोंकदार ॥ ५२६ ॥

साक्या.

रात्रीं रमणी रमण करूनी सत्वर भोजन हर्षें ।
दिवाणखान्यांतिल पर्यंकीं जाती ते संतोषें ॥ ५२७ ॥
श्वशुर श्वश्रू निद्रित होतां सासुरवाशी जाती ।
लगबग लगबग रंगापूरित पात्रा घेउन हातीं ॥ ५२८॥

मालिनी.

छत खुलत असे तें स्वच्छ झाडें हि हंड्या ।
सुबक तसबिरी ही, शोभती रम्य माड्या ।

गजगति चढतांना पायऱ्या त्या जिन्याच्या ।
छुमछुम रव कर्णा हर्ष देई प्रियाच्या ॥ ५२९ ॥

साकी.

मूद फिर्किचें फूल राखडी केतक सुचंद्रकोर ।
मौक्तिक कुरडू बुगड्या बाळ्या काप हि कानीं थोर ॥

शिखरिणी.

सुतेजें मोत्यांची नथ खुलतसे ती तिनतुरी ।
गळीं मुक्तापेंडीं तनमणि ठुशी माळ हि सरी ।
सुती-वांकी तोडे विलसति जवे गोठ सुकरीं ।
पदीं मोठे तोडे छुमछुम रवा नूपुर करी ॥ ५३१ ॥

साकी.

रमणीचरणीं नूपुरसिंजित झुणुझुणु वाजत राहे ।
वाटे मजला मदनधनूची झंकृति होत असे हे ॥५३२॥

शिखरिणी.

सु[1]शब्दालंकारीं अति-मृदु[2]सुवर्णीं युत किती ।
पहा शोभा मोदा करित असती काव्य सुदती ।
मृदु स्त्री काव्यें ही, कठिण च सु[3]वृत्तीं कुचयुगीं, ।
असे काठिण्याचें रसिकपुरुषा सौख्य च जगीं॥५३३॥

दिंड्या.

चकचकाटें चमकती भूषणें तीं ।
सुंदरीचें तारुण्य शोभवीती ।

---

१ सुंदर शब्दयुक्त अलंकारांनीं=भूषणांनीं, सुशब्द आणि अर्थालंकार यांनीं युक्त. २ उत्तम आहे सुवर्ण ज्यांचे ठायीं ( सुशब्दालंकारीं याचें विशेषण ), अत्यंत मृदु आहेत सुवर्ण=अक्षरें ज्यांचे ठायीं ३ वाटोळे, सुंदर वृत्तें=छंद आहेत ज्याचे ठायीं ( काव्यादि० ).

हार विलसे कुच-कुंभ-शुभ्र-धारा ।
भीरु करि कीं अभिषेक गमे मारा[1] ! ॥५३४॥

कंदुक[2], स्तन, लावण्य-मौक्तिकाचे ।
स्वर्णनिधि कीं कंदर्प राजयाचे ।
स्मरें मंत्रित लिंबें च मोहण्या कीं ।
सौख्यवेलीं[3] लटकलीं फलें झोकीं ! ॥ ५३५ ॥

बाहुलतिकाकंद[4] कीं कुच जणूं ते ।
युग्म[5] यौवन-तरु-फलांचें[6] च कीं तें ।
रम्यसंपुट[7] सौंदर्य-हीरकाचें ।
वर्तुल स्तन वाटती सुंदरीचे ! ॥ ५३६ ॥

मालिनी.

कठिणहृदय अन्यद्रव्यजीवा हरूनि ।
दिनभर मग वस्त्रीं राहती ते लपूनी ।
कुच नवतरुणीचे वाटती स्तेन[8] मातें ।
स्तन चुकुनि तयांला बोलती लोक कीं ते ! ५३७

साकी.

रंगा लपवुनि लज्जित सुमुखी जाते मंचीं बाला ।
नवपरिचितपतिसंगा प्रथम चि सण भीरूला आला ॥

शिखरिणी.

उशी गिर्द्या गादी पर भरुन केला विलसतो ।
बिछाना पर्यंकीं अतिमृदु असे हातभर तो ।
वरी राहे स्वच्छास्तरण जुळिली रम्य-दुलयी ।
गुलाबी पाणी ही घमघमित तैलें हि निलयीं ॥ ५३९ ॥

---

१ मदनाला. २ चेंडू. ३ सुखाची वेल=स्त्री. ४ बाहूरूप लतेचे कंद. ५ द्वय. ६ तारुण्यरूप वृक्षफलांचें. ७ डबे. ८ चोर.

स्रग्धरा.

चांदीचें शोभतें तें तबक अडकिता घागऱ्या ज्यास हैम।
गोळ्या पत्री लवंगा क्रमुक[1] विलसती वेलदोडे बदाम।
सामानें चौफुला ही खुलति बहु डब्या सांखळीचा चुनाळ
पक्कीं पानें सुवर्णें कृत जणुं गमती पानदानीं रसाळ ॥

दिंडी.

विडा प्रेमें देतसे प्रिया पाहें ।
एक वस्तु हि आरक्त त्यांत नोहे ।
कुठुन लाली त्यामधें येत आहे ।
चित्रकरणी सुंदरी-करीं राहे ॥ ५४१. ॥

साकी.

रागानें कृत तांबूलीं कीं राग च रमणी ठेवी ।
किंवा पल्लवहस्तांतिल तो राग च त्याला लावी॥५४२॥

दिंडी.

हें हि नोहें मज गमे अन्य ऐका ।
अनंगाचा हा व्यक्त राग हो कां ।
वधूपुरुष क्रीडा-सुखास घाई ।
कां न करिती अद्यापि ह्मणुनि होई॥ ५४३ ॥

साकी.

सुमुखीच्या प्रिय मुखांत घाली प्रेमानें तांबूल ।
बिंबोष्ठीमुख रंगित, वर नथ चमके ते तेजाळ॥५४४॥

दिंड्या.

वदन रंगित तांबूलचर्वणानें ।
लाल कमला लाजवी सुशोभेनें ।

---

१ सुपारी.

नयन सांजन चलदीर्घलोचनेचे ।
निशित शर कीं विषदिग्ध सुमधनूचे ॥५४५॥
लाल कुंकू टिकली हि ती विशालीं ।
सुतनुभालीं रेखली दिसे शाली ।
स्मरें रमणीसाधनें सकल-लोकां ।
मारुनी कीं लाविला रक्त-टिक्का ! ॥ ५४६ ॥

साकी.

प्रीस् करूनी जाउनि आणी रंगातें चलनेत्री ।
पिचकारीनें प्रियकरवक्षीं उडवीं रंग सुगात्री ॥५४७॥

दिंडी.

अनंगानलसंतप्त वल्लभांगीं ।
थंड रंगा टाकिते सुंदरांगी ।
घृत च जणुं तो, हो, तनूची हि आग ।
स्मराग्नीची ज्वाला चि लाल रंग ॥ ५४८ ॥

साकी.

प्रियकर रागें गौरांगीच्या अंगीं उडवी रंग ।
कर्वतिकांठी पातळ रंगें रंगित होई अंग ॥ ५४९ ॥

शिखरिणी.

छटे रंगाचे ते विरलमृदुवक्षीं विलसती ।
गुलालाची तैशी धुनुक दिसते लाल वरती ।
सुकेशीच्या भांगामधिं दिसतसे सुंदर छटा ।
स्वरूपें दोघांचीं खुलति दिसते कांति हि पटा५५०

वसंततिलका.

तांबूलरंगित अनंतर केशराच्या ।
रंगें सुरंगित, वधूप्रिय होति साचा ।

होताति रंगित तसे च अनंगरंगें ।
ज्ञाती बुडून मग त्यामधिं ते सुरागें ॥ ५५१ ॥

शार्दूलविक्रीडित.

पूर्वी एकमतें विचार पुरुषीं केला असे कीं असा ।
स्त्री-साह्याविण हा करूं च शिमगा, आरंभिला, तो कसा
होई गोड? धुळीस लोक मिळती चाऱ्ही दिनीं कष्टती।
घेतां ते रमणी-सहाय्य, बुडती रंगांत, नान्या गती ! ॥

दिंडी.

तमाशाचा होतसे थाट रात्रीं ।
देति वेश्यागायनें सुखें श्रोत्रीं ।
पुरुष वेश्या सविनोद शिंपडीती ।
रंग वस्त्रीं सानंद उभय होती ॥ ५५३ ॥

मालिनी.

चपलनयनभंगें प्रेम एकास दावी ।
पर मधुरवचें ती स्नेहपाशांत गोंवी ।
सुरत-रस-सुखाचा नाद अन्यास लावी ।
सकपटचलवेश्याचित्त एकत्र केवीं ! ॥ ५५४ ॥

साकी.

स्फुट कुच दावुनि विनोद करुनी हांसुनि चित्ता मोही
बाह्यमंजुला अंतर्मलिना वेश्या असती पाहीं ! ॥५५५॥

पद.

गड्यांनो, तो जगदीश भजा ! ॥ ध्रु० ॥
कृपें जयाच्या साहि ऋतूमधिं, आहे बहुत मजा । ग०
वसंतसीतलवात फुलांतिल, फिरतो घेत रजा ॥ ग० ॥
द्राक्षाम्रादिक मधुरस सुफलें करितो फार चिजा । ग०

सुपीक होण्या करी उष्णता, ग्रीष्मीं तो न दुजा । ग०
वर्षुनि वर्षा हर्षा देतो शमवुनि ताप रजा ॥ ग० ॥
शरदीं धान्यें सुजलें करितो शोभा करि जलजा । ग०
सुफलीं पुष्पीं मुदित करी तो घनमल जाति विजा । ग०
हेमंतीं रुचि अन्नजला अति देतो सुख मनुजा ॥ ग० ॥
शिशिरीं नाहीं कमी रंग, पण लवकरि तुह्मि उमजा । ग०
ऋतुवर्षादिक रूपें त्यांचीं, काल चि तो समजा ॥ ग० ॥
कृतकर्माच्या अहंकृतीच्या सोडुनि द्या गमजा ॥ ग० ॥
लक्षीं ठेवा, पापापासुनि होइल सौख्य वजा ॥ ग० ॥
सर्पापरि हा काल जातसे पाहुनि त्यास बुजा ॥ ग० ॥
भजनसमाजीं विभुकीर्तीच्या गजरा संतत जा ॥ ग० ॥
विभुदृढनावें संसारार्णव तरण्या शीघ्र धजा ॥ ग० ॥

---

# मुळांतील अशुद्ध शब्दांचें शुद्धीपत्र.

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|
| १० | जेवि | जेंवि |
| ७७ | विषयीं | विषयी |
| ८४ | टाकिती | टाकिति |
| ९० | दोषीं | दोषी |
| ९३ | नामीं | नामी |
| ९८ | पोहुन | पाहुन |
| १०६ | ओच्यास | ओंच्यास |
| ११८ | ओटी | ओंटी |
| १२६ | जणू | जणुं |
| १३० | टाकिति | ठाकति |
| १३९ | म्हणूनी | ह्मणुनी |
| १७१ | दगतं | दगंत |
| १८७ | तरुछायेंत | तरुच्छायेंत |
| १८९ | वाटे | वाटें |
| २०० | आणी | आणि |
| २३६ | पांथस्थ | *पांथस्थ |
| २५३ | पंडितांही | पंडितां ही |
| ३२१ | मलिना? | मलिना ! |
| ३२९ | समंद | समँद |
| ,, | वृँष | वृँष |
| ३२९ | झुंजां | झुंजा |
| ३३२ | मनां | मना |
| ,, | वाटे | वाटें |
| ३४७ | स्मरविधु | स्मर |
| ,, | सुहृत् | विधुसुहृत् |
| ३४८ | मन्मथ | मान्मथ |
| ३५२ | मग | मन |
| ३६५ | विद्यास | विद्यांस |
| ३६८ | त्यांसीं | त्यांसी |
| ३७१ | चारीं | चाऱ्ही |
| ३७३ | हि | हो |
| ३७९ | पतिस | पतिंस |
| ३८० | प्रीति | प्रीती |
| ४०४ | सीतें | शीतें |
| ४०५ | अन्य ऋतूंची | अन्यर्तूंची |
| ४०८ | सीताचें | शीताचें |
| ४०९ | वृक्षावरी | वृक्षांवरी |
| ४१२ | ढिगावर | ढिगांवर |
| ४१२ | कृषिकांहीं | कृषिकींच |
| ४२४ | हीं | ही |
| ,, | शंखभाती | शंख भाती |
| ४२५ | वाटे | वाटें |
| ४३० | सीत | शीत |
| ४३१ | सीतार्ति | शीतार्ति |
| ४६८ | जरि शाली | जरिशाली |
| ४७३ | वर तेहि | वरती हि |
| ४७९ | सीत | शीत |
| ४८० | सीत | शीत |
| ४८१ | सीत | शीत |
| ४८६ | वनश्री स्त्री | वनश्रीस्त्री |
| ४९६ | ते | तें |
| ४९६ | ऋतु दीनदशा | ऋतुदीनदशा |
| ५१० | सीतानें | शीतानें |
| ५२० | तद्विनाशी | तद्विनाशीं |
| ५४६ | लाल कुंकूं टिकली | लालकुंकूं-टिकली |
| ५५६ | वसंत सीतल | वसंतशीतल |
| ,, | त्यांचीं | त्याचीं |

# टिपांचें शुद्धीपत्र.

| पद्य. | अंक | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ५२ | १ | पर्वत. | पर्वत, राजे. |
| ,, | २ | पायकिरण. | दररोज. |
| ,, | ३ | पाय. | पाय, किरण. |
| ८९ | ४ | गुणवतीच होय. | गुणवतीच कारण होय. |
| १०० | | लक्ष्मीच | ३ लक्ष्मीच |
| ,, | ३ | सुखाचें घर. | ४ सुखाचें घर |
| १०१ | ४ | हात. | ५ हात. |
| ,, | ५ | कान | ६ कान. |
| १०५ | ३ | एकनच. | ऐकूनच. |
| १५२ | १९ | मोत्यांच्याकांतीची. | मौत्तिक नक्षत्रांची. |
| २२२ | ३ | उदक | उदक, उपजीवन. |
| २३५ | | अचल नढळणारे. | ११ नढळणारे. |
| २३६ | * | ११ हाशब्दजरीइ० | * हाशब्दजरीइ० |
| २५७ | ५ | जुई. | जुई, ( वेश्या. ) |
| ३४५ | १७ | हलकेपणा. | लहानपणा. |
| ३४८ | ४ | मदन | मदनाचें ( मान्मथ. ) |
| ,, | ५ | कटाक्ष | स्त्रियांचे कटाक्ष. |
| ४३३ | | १ | ५ |
| ४५४ | ६ | मदनाला, रतीला. | मदनाला एक व रतीला एक |